# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३

## (सकाळी ०९.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**(अ) अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना क्रमांक १ व २)**

**(१) श्री.अमिन पटेल, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईमध्ये नोंदणीकृत सरकारी तसेच खाजगी रुग्णालयांची संख्या १३०० हून अधिक असणे, या रुग्णालयांव्यतिरिक्त अनेक बेकायदा रुग्णालये मुंबईमध्ये आढळून येणे, बेकायदा रुग्णालयांचे सर्वाधिक प्रमाण मानखुर्द, गोवंडी, शिवाजीनगर परिसरात असणे, काही रुग्णालये अतिशय चिंचोळ्या गल्लीत असून दुर्दैवाने आगीची घटना घडल्यास तेथे आगीचे बंब पोहोचण्यास अडथळे निर्माण होणे, मुंबईमधील अनेक खाजगी, सार्वजनिक रुग्णालये आणि नर्सिंग होम यांचे फायर ऑडीट न होणे, या रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा असणे, अनेक वैद्यकीय चाचण्या बाहेरुन करुन घेण्यावर या रुग्णालयांचा भर असणे, या रुग्णालयांमध्ये सोयीसुविधांचा अभाव असणे, त्यामुळे रुग्णांच्या जीवास धोका निर्माण होणे, खर्चिक वैद्यकीय सेवेमुळे रुग्ण खचून जाणे, रुग्णालयांना आग लागण्याचे प्रमाण वाढत असणे, विनापरवाना खाजगी रुग्णालये, नर्सिंग होम राजरोसपणे चालू असणे, या रुग्णालयांवर कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी रुग्णांची होणारी आर्थिक छळवणूक व त्यांच्या नातेवाईकांमध्ये पसरत असलेला असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. अस्लम शेख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई उपनगरातील मालाड (प.) मालवणी, दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाचे २५०० बैठे निवासी गाळे असणे, शासनाने दिनांक १८ मे, १९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू केलेली असणे, त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुसार परवानगी देण्यात आलेली असणे, परंतु सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळाला असून २५०० बैठे निवासी गाळेधारकांपैकी १४२९ निवासी गाळयांना विक्री योजनेअंतर्गत सहभागी करण्यात येणे, उर्वरित १०७१ बैठे निवसी गाळे धारक अपरिहार्य कारणामुळे योजनेत सहभागी होऊ शकलेले नसणे, बैठे निवासी गोळेधारक अत्यल्प उत्पन्नधारक असणे, अनेक गाळे धारकाकडे पैसे नसल्याने सदरच्या विक्री योजनेत

अग्रिम प्रत

सहभागी होता आलेले नसणे, शासनाने १०७१ बैठे निवासी गाळे धारकांसाठी नवीन विक्री योजना जाहिर करून निवासी गाळे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना क्रमांक ३ व ४)**

**(३) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"केंद्र शासनाने दिनांक १ मे, २०१६ रोजी स्थावर संपदा अधिनियम (महारेरा) मंजूर केला असणे, त्यानुसार दिनांक १ मे, २०१७ रोजी शासनाने कायदा मंजूर करुन त्याची राज्यात अमंलबजावणी सुरु करणे, सदरहू कायद्याची राज्यात शासनाने प्रभावीपणे अमंलबजावणी न केल्यामुळे महारेरा प्राधिकरणाकडे नोंदणी झालेल्या ४० हजार ६०० प्रकल्पांपैकी २८ हजार ५९० गृहप्रकल्प १० ते १५ वर्षापासून प्रलंबित राहिल्याने प्रकल्पात घर खरेदी करण्याकरिता आर्थिक गुंतवणूक केलेले १ कोटी ६ लाख ग्राहक अद्याप घरापासून वंचित राहणे, महारेरा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरही विकासकांनी गृहप्रकल्पांची माहिती अद्ययावत न ठेवता महारेरा अधिनियमाचे स्पष्टपणे उल्लंघन केल्यामुळे सुमारे १५ हजारांहून अधिक गृहप्रकल्पांना प्राधिकरणाव्दारे नोटीसा बजावण्यात येणे, तसेच नोंदणीकृत १०७ गृह प्रकल्पांची नोंदणी रद्द करण्यात येऊन सुमारे ३०८ प्रकल्प दिवाळखोरीत गेल्याचे महारेराने जाहिर करणे, महारेरा प्राधिकरणाकडील अपुऱ्या अधिकारी व कर्मचारीवर्गामुळे कायद्यानुसार ६० दिवसात प्रकरणे निकाली काढणे आवश्यक असतानाही वर्षानुवर्षे प्रकरणे प्रलंबित राहून गुंतवणूकदार ग्राहकांची मोठ्या प्रमाणात झालेली गैरसोय, यासंदर्भात राज्यातील महारेरा प्राधिकरणाकडे नोंदणी झालेले व रखडलेले गृहप्रकल्प विनाविलंब मार्गी लावण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अस्वाक्षरित प्रत

**(४) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"तालुका हवेली (जि.पुणे) अंतर्गत खडकवासला विधानसभा क्षेत्रातील ग्रामपंचायत घेरा सिंहगडच्या २ ग्रामपंचायतींमध्ये विभाजन करण्याची मागणी असणे, गावांतील ग्रामस्थांची प्रशासकीय कामांसाठी गैरसोय होत असून या ग्रामपंचायतीमध्ये सध्या ४ महसुली गावे (थोपटेवाडी, सांबरेवाडी, घेरा सिंहगड, मोरदरवाडी) मिळून २१ वाड्या वस्त्या अस्तित्वात असणे, परंतु सन २०११ च्या जनगणनेनुसार ग्रामपंचायत घेरा सिंहगडची लोकसंख्या १९४८ असल्याने आजमितीस ती जवळपास २५०० च्या आसपास असल्याने प्रशासकीय कामे वेळेवर न होणे, त्यानुसार गावातील प्रशासकीय कामांची गैरसोय दूर करण्याबाबत ग्रामपंचायत विभाजनाचा विहित प्रस्ताव पुणे जिल्हापरिषदेकडून शासनास सादर केलेला

असणे, सदर प्रस्ताव अद्यापही प्रलंबित असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली तथापि चर्चा न झालेली अर्धा-तास चर्चेची सूचना)**

**(५) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.**

"राज्यात गृहनिर्माण संस्थांच्या भूखंड व चटई क्षेत्राचा लाभ हस्तांतरित करण्याबाबत" या विषयावरील श्री.सुनिल प्रभू व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ६५१०४ ला दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ३)**

**(१) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरांमध्ये महापालिका शाळांवर कोट्यावधी रुपयांचा खर्च केला जात असणे, दुसरीकडे विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी पुरेसे शिक्षक उपलब्ध नसणे, शैक्षणिक गुणवत्तेचा व विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण होणे, विद्यार्थी नियमितपणे शाळेत येणे पण त्यांना शिकवायला शिक्षकच नसणे, ही दुरावस्था एखाद्या खेड्यातील अथवा दुर्गम भागातील नसून विद्येचे माहेरघर समजणाऱ्या पुणे शहराची असणे, महापालिकेच्या शाळांमधील एकूण ७२७ शिक्षकांच्या जागा रिक्त असणे, अंतर जिल्हा बदलीतून २१९ शिक्षकांना मान्यता देण्यात येणे, परंतु शिक्षण विभागाने सदरचा प्रस्ताव अडवून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर येणे, अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांची झाडाझडती घेणे, शिक्षकांची नियुक्ती न केल्याचा आदेश त्वरित काढा अन्यथा कारवाई करण्याचा इशारा अतिरिक्त महापालिका आयुक्तांनी देण्यात येणे, मराठी, उर्दू, कन्नड, इंग्रजी माध्यमाच्या एकूण २८४ शाळा असणे, त्यामध्ये अंदाजे ९३ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असणे, बिबवेवाडी गावातील सरसेनापती हैबतराव शिळीमकर माध्यमिक शाळा येथील विविध समस्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी महापालिका आयुक्त यांना दिनांक १९ एप्रिल, २०२३ रोजी निवेदन देण्यात येणे, यामध्ये शाळेतील शौचालय, पाणी, विद्युतची साधने, अस्वच्छता, सी.सी.टीव्ही, सुरक्षा रक्षकांचा अभाव, शिक्षक नसणे, शाळेमध्ये विद्यार्थ्यांकरीता क्रिडांगण असणे, परंतु सदर क्रिडांगण हे खाजगी संस्थेला दिल्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना हे क्रिडांगण उपलब्ध न होणे, सदर निवेदनामध्ये कारवाई करण्याबाबतच्या सूचना देण्यात येणे, यासंदर्भात महापालिका आयुक्त यांनी दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी शिक्षणाधिकारी, शिक्षण मंडळ यांच्यासमवेत महापालिकेमध्ये बैठक

अग्रिम प्रत

घेण्यात येणे, महापालिका आयुक्त यांनी याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देऊनही माहे जून पर्यंत याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना शिकविण्याठी शिक्षक उपलब्ध नसणे, यासाठी शिक्षण मंडळाने शिक्षक उपलब्ध होण्याबाबत एका संस्थेची निवड करण्यात येणे, या संस्थेच्या माध्यमातून संबंधित शाळांना शिक्षक उपलब्ध होणे, परंतु सदर शिक्षक हे शाळेमध्ये नियमित न जाणे, परिणामी विद्यार्थ्यांचे नुकसान होणे, अशीच परिस्थिती पुणे शहरातील विविध शाळांमध्ये असणे कै. वस्ताद हरिभाऊ पोकळे शाळेमध्ये शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान, याबाबत स्थानिक माजी नगरसेवक व संतप्त नागरिकांनी महापालिका आयुक्त यांच्याकडे शिक्षक नियुक्तीची मागणी करण्यात येणे, परंतु शिक्षण मंडळ शिक्षकांची नियुक्ती करीत नसेल तर स्वखर्चाने शिक्षक नियुक्त करू असा इशारा देण्यात येणे, एकीकडे कोट्यावधी रुपये महापालिकेच्या विविध योजनांकरीता खर्च करीत असताना पुणे शहरातील महापालिकेच्या शाळांची होत असलेली दुरावस्था, परिणामी विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान, शाळांच्या दुरावस्थेला जाबाबदार असलेल्या तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी यावर कोणती उपाययोजना न करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चंद्रपूर तालुक्यात ताडाळी येथील एम.आय.डी.सी. परिसरात धारिवाल पावरप्लँट अस्तित्वात असणे, सदर पावरप्लँट मध्ये जुन्या मशनरींचा वापर होत असणे, सदर प्लँटमुळे सभोवतालच्या परिसरात प्रदूषण होत असल्याचे माहे जुलै, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, या प्लँटद्वारे वर्धा नदीच्या पात्रातून पाणी चोरी केली जात असणे, या प्लँटमुळे तयार होणारी राख शेतकऱ्यांच्या शेतात पसरली जात असणे, यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत असणे, कंपनीद्वारे शेतकऱ्यांना कुठलीही मदत मिळत नसणे, या कंपनीमुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होऊन वारंवार अपघात होत असणे, या कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री.संतोष दानवे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील (जि.जालना, ता.भोकरदन) नळणी खुर्द, जवखेडा, सिरसगांव (वा), बाबुलगांव, पिंपळगाव, कोठा दाभाडी इत्यादी गावांतील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची पदे अनेक वर्षांपासून रिक्त असल्याने पूर्व प्राथमिक शाळांत शिकणाऱ्या मुलांचे शैक्षणिक भविष्य अंधःकारमय होण्याची नामुष्की ओढवणे, सर्वसाधारण जिल्हा बदली प्रक्रिया २०२२ अंतर्गत शिक्षकांच्या बदली प्रक्रियेनंतर भोकरदन तालुक्यातील शिक्षकांची बरीचशी पदे रिक्त असल्याबाबत स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी लेखी स्वरूपात संबंधित अधिकाऱ्यांकडे मागणी केली असणे, जि.प.शाळा सांवगी (आ) केंद्रीय पिंपळगाव येथे १ ली

अग्रिम प्रत

ते ८ वी पर्यंत वर्ग असून एकूण २२० विद्यार्थी नियमित शिक्षण घेत असणे, शिक्षक संख्या मु अ सह एकूण ०६ शिक्षक कार्यरत असणे, ईयत्ता ६ वी ते ८ वी साठी फक्त एकच शिक्षक कार्यरत असणे, सदरहू शाळेत शिक्षक पदे रिक्त असून अद्याप नियुक्ती न झाल्याने शिक्षणाचा खेळखंडोबा होणे, पालक-गांवकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन रिक्त पद असलेल्या शाळांतील रिक्त पदे प्राधान्याने भरण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष यामुळे सदरहू भागातील स्थानिक नागरिकांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ)** तारांकित प्रश्न

**(ब)** तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

**सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** : "पुणे येथील रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात किडणी प्रत्यारोपण प्रकरणी झालेला गैरप्रकार" या विषयावरील श्री. भिमराव तापकीर व इतर वि.स.स यांचा दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ४४७१४ च्या अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(क)** अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक १८१ ते १८७ सभागृहाच्या पटलावर ठेवणे

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री** :

**(क)** विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पंचवीसावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक वित्तीय अहवाल व सन २०२०-२०२१ या कालावधीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रण व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**(ग)** महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) "मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन लेखापरीक्षा अहवाल" तसेच (२) "इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी यावरील संपादणूक लेखापरीक्षा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **वस्त्रोद्योग मंत्री** : महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ व महामंडळाची उपकंपनी दि प्रताप स्पिनिंग, विव्हींग आणि मॅन्युफॅक्चरिंग कंपनी मर्यादित, अमळनेर यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा अनुक्रमे चौपन्नावा व एकशे एकोणीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(४) **गृहनिर्माण मंत्री** : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक लेखा आणि स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती / राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करणे**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(अ)** (१) **श्री.जयंत पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"इचलकरंजी शहराची (जि. कोल्हापूर) लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून या शहराला यंत्रमागाचे शहर असे संबोधले जात असून हे शहर कधीही न थांबणारे वर्षाचे बाराही महिने सुरु असणारे शहर असणे, परंतु, या शहराला फारच कमी प्रमाणात पाणीपुरवठा होत असल्यामुळे तेथील नागरीकांना ३ ते ४ दिवसाआड पाणीपूरवठा केला जात असणे, या शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना करण्याची नितांत

अप्रधिकृत प्रत

आवश्यकता असल्यामुळे तत्कालीन शासनाने दिनांक १८ जून, २०२० रोजी सुळकुड योजनेस मंजूरी देणे, अद्यापही या योजनेच्या कामास सुरुवात न झाल्यामुळे तेथील नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, सुळकुड योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पुरविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्याला बाधा येत नसून सर्व क्षेत्र ओलिताखाली आल्यानंतरसूध्दा सिंचनासाठी पाणीसाठा शिल्लक राहणार असणे, त्यामुळे या योजनेच्या कामास त्वरीत सुरुवात करुन इचलकरंजी शहरातील नागरिकांना पुरेश्या प्रमाणात पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

**(२) ॲड. आकाश फुंडकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"खामगांव तालुक्यातील श्रीराम एज्युकेशन सोसायटी, खामगांव, जि.बुलढाणा व्दारा संचालित निवासी मुकबधीर विद्यालय, खामगांव यांच्या वर्ग ८ ते १० करीता वाढीव विद्यार्थी संख्येस अनुदान तत्वावर मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सचिव, सामाजिक न्याय मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक ८ ऑगस्ट, २०२२ रोजी दाखल करण्यात आला असणे, परंतु त्यावर कक्ष अधिकारी, अपंग विभाग-१ यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी प्रस्ताव सादर केला असता सचिव, सामाजिक न्याय यांनी धोरण स्पष्ट होईपर्यंत प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याचा निर्णय केला असणे, राज्यातील मुकबधीर व मतिमंद मुलांच्या शाळेला अनुदान तत्वावर मान्यतेबाबत बृहत आराखडा व पदमान्यता नसल्याने अनेक वर्षापासून अशा शाळांना अनुदान न मिळणे, बिगर अनुदान तत्वावर वर्षानुवर्ष या शाळा कार्यरत असल्याने शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना विनावेतन किंवा कमी वेतनावर काम करावे लागत असणे, अनुदानाअभावी दिव्यांग, मंतीमंद, मुकबधीर विद्यार्थी-विद्यार्थीनींचे निवासी शाळा चालवणे कठीण झाले असणे, बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव तालुक्यात उपरोक्त शाळा निवासी मुकबधीर विद्यालय हे विदर्भातील ४ जिल्ह्यातील १० वी पर्यंतची कर्णबधीर विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी एकमेव शिक्षण संस्था असणे, सन २०१० पासून ही संस्था वर्ग ८ ते १० पर्यंत विनाअनुदान तत्वावर शाळा चालवित असणे, त्यामुळे सदर संस्थेसमोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले असणे, शासनास प्राप्त झालेल्या अनुदान व पदमान्यतेच्या प्रस्तावास तात्काळ मान्यता देण्याची आवश्यकता, तसेच वर्ग ८ ते १० करीता वाढीव विद्यार्थी संख्येस अनुदान तत्वावर "विशेष बाब" म्हणून मान्यता देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री.मिहिर कोटेचा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"औद्योगिक प्रशिक्षण संस्था लोअर परेल यांची वापरात असलेली इमारत मोडकळीस आल्याने तसेच जागा अपुरी पड़त असल्याकारणाने नवीन जागा ११६ बी, अरबी चांदोरकर मार्ग, आगरी पाडा, मुंबई ११ येथे देण्याचे शासन निर्णय द्वारा ठरणे,

अग्रिम प्रत

तसेच त्याकरिता महाराष्ट्र शासनद्वारा आर्थिक तरतूद सुद्धा करण्यात येणे, सदरील जागा ही औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस लोअर परेल यांच्या ताब्यात देण्यात आलेली असताना सदरील जागेवर होमलेस शेल्टर चे आरक्षण असणे, सदर आरक्षण बदलून ते (इतर शिक्षण) Other Education करावे अशा स्वरूपाचा पत्रव्यवहार वेळोवेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारा करण्यात येणे, परंतु त्यास तत्कालीन शासनाने कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद देण्यात न येणे आणि २०२० साली मंजूर झालेल्या डीपी २०३४ मध्ये हे आरक्षण बदलून इतर शिक्षण असे करण्यात येणे, आणि सदगीर आरक्षण बदलल्यानंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारा महानगरपालिकेशी पत्रव्यवहार करून मोजणी करणे, तसेच संरक्षण भिंत बांधण्यास परवानगी मागण्यात येणे व याबाबतचा झालेला पत्रव्यवहारही उपलब्ध असून, सदरील बाबीस मुंबई महानगरपालिकेद्वारा कुठल्याही प्रकारे प्रतिसाद न देणे, दिनांक २५ ऑक्टोबर, २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था लोअर परेल यांना शैक्षणिक वापराकरीता देण्यात आलेली जागा प्रस्तावित भूभाग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला शैक्षणिक उद्दिष्टा करता देण्यात आलेला असतानाही संस्थेकडून सदर भूभागावर शैक्षणिक उद्दिष्ट अनुरूप कोणतेही बांधकाम करणात आलेले नसल्यामुळे हा भूभाग वापराविना आहे तसाच ठेवून मग त्याच्या अटी व शर्तीचा भंग केलेला असणे, तसेच सदरील मक्त्याने दिलेल्या भूभागाचे संपूर्ण विहित भुई भाडे महाराष्ट्र शासनाकडून महानगरपालिकेला अद्याप प्राप्त झालेले नाही अशा रूपाचे कारण दाखवून ती जागा परत घेण्याचा निर्णय ठरावाबाबत करण्यात येणे, तसेच सदरील भूभाग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून काढून घेऊन त्या जागेवर उर्दू लर्निंग सेंटर, उर्दू भवन उभारण्याचा निर्णय परस्पर घेण्यात येणे, तसेच तीन महिन्यांचे आतच म्हणजे फेब्रुवारी, २०२२ मध्ये साडेबारा कोटी रुपयांचे उर्दू लर्निंग सेंटर उभारण्यासंदर्भातले टेंडर ही मागवण्यात येणे, तसेच सदरील टेंडर मागवून प्रक्रिया राबवून सदर जागेवर उर्दू लर्निंग सेंटर संदर्भात बांधकाम सुरू करण्यात येणे, तसेच सर्व बैठका बी.एम.सी ने कोरोनाकाळात घेणे, आणि याबाबतीत कोणत्याही बैठकीचे पुरावे नसणे किंवा मिनिट्स नसणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**(४) श्री.गणपत गायकवाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कल्याण पुर्व शहरातील तिसगाव नाका ते सिद्धार्थ नगर ते काटेमानिवली नाका हा यु-टाईप रोड कल्याण रेल्वे स्टेशनकडे जाणारा रहदारीचा व वाहतुकीचा एकमेव रस्ता असणे, कल्याण पूर्वेतील वाढती लोकसंख्या तसेच पुनालिंकरोड पलीकडे कल्याण पूर्व क्षेत्र व पूर्वेकडील विकसित होणारे क्षेत्र विचारात घेता भविष्यात कल्याणकडे रेल्वे स्टेशन कडे येणारी नागरिकांची रहदारी याचा विचार करता सदर रस्ता हा २४ मीटर (८० फूट) प्रस्तावित करणे आवश्यक असणे, यामुळे भविष्यात कल्याण पूर्वेतील रहदारीचा मोठा प्रश्न सुटण्यास मदत होणार असणे, यामुळे

अग्रिम प्रत

भविष्यात कल्याण पूर्वेतील रहदारीचा मोठा प्रश्न सुटण्यास मदत होणे, कल्याण पुर्व शहरातील यु-टाईप रोड व शहरातील अनेक रस्ते रूंदीकरणामुळे शहरातील हजारो मालमत्ता धारक बाधित होत असणे, परंतु रस्ता रूंदीकरणामुळे नुकसान होणाऱ्या नागरीकांवर देखिल कोणत्याही परिस्थीत अन्याय होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे असणे, कल्याण पुर्वेतील अनेक नागरीक यापुर्वी देखिल अनेक वेळा रूंदिकरण करण्यात आले असुन बाधित नागरीकांना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई अथवा पुनर्वसन करण्यात आलेले नसणे, त्यामुळे नागरिकांचा या रस्ता रुंदीकरणास विरोध असणे, कल्याण पुर्व शहरातील यु-टाईप रोड रस्ता रुंदीकरणातील बाधित होणाऱ्या नागरिकांचे तातडीने बी.एस.यु.पी. योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये अथवा रहिवाशी इमारती मधील महानगरपालिकेच्या मालकीच्या सदनिकेमध्ये नागरिकांचे अशा मालमत्ताधारकांचे तातडीने पुनर्वसन करून कल्याण पुर्वेतील तिसगाव नाका ते काटेमानिवली नाका या यु-टाईप रस्त्यांचे काम तातडीने सुरु करण्यास्तव नागरिकांची होत असलेली सततची मागणी, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक महानगरपालिकेअंतर्गत विविध अंगणवाड्यांमध्ये मुख्य अंगणवाडी सेविका, अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस या पदावर अनेक महिला कार्यरत असणे, या महिलांना तीन तास काम करण्याचे सांगून या महिलांकडून रोज चार ते पाच तास काम करून घेतले जाणे, त्याच बरोबर शासनाच्या विविध योजनांसाठी नागरिकांमधून माहिती मागवण्यासाठी या अंगणवाडी सेविकांचा वापर केला जाणे, यात प्रामुख्याने जनगणना. शासन स्तरावरील सर्वेक्षण, मतदार नोंदणी, मतदारांची नावे कमी करणे, लोकसभा विधानसभा व नगरपालिका यांच्यासाठी मतदार यादी तयार करणे, बी. एल. ओ. म्हणून काम करणे इत्यादी शासकीय कामे महिलांना सांगितली जात असणे. यासाठी अत्यंत अत्यल्प मोबदला दिला जात असणे, त्यामुळे या महिलांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक अडचण होत असणे, नाशिक महानगरपालिका 'ब' वर्ग महानगरपालिका असून मुख्य सेविका यांना ६५०० रुपये,अंगणवाडी सेविका यांना ५५०० रुपये व अंगणवाडी मदतनीस यांना ५४२० रुपये मानधन दिले जात असणे, राज्यातील इतर 'ब' वर्ग महापालिकांच्यापेक्षा ते अत्यल्प असणे, पिंपरी चिंचवड महानगर पालिका १०००० ते २०००० नवी मुंबई महानगर पालिका १५००० ते २०००० मानधन देत असणे, शासनाच्या अंगणवाडीत देखील १०००० मानधन देण्यात येत असणे, अंगणवाडी मुख्य सेविका, अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांचा काम करण्याचा कार्यकाळ तीन तासाहून वाढून सहा तास करण्यात येऊन नाशिक महानगरपालिके अंतर्गत विविध कामे जसे नोटिसा

अग्रिम प्रत

देणे, घरपट्टी व पाणीपट्टी पोहोचवणे, घरपट्टी व पाणीपट्टीची वसुली नोटिस देणे इत्यादी कामे या महिलांकडून करून घेतल्यास या महिलांच्या उत्पन्नातवाढ होऊन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीसाठी देखील मदत होणार असणे, नाशिक महानगरपालिका अंतर्गत अंगणवाडी सेविकांचे मानधन १५००० रुपये करण्याची असणारी आवश्यकता, याबाबत महानगरपालिका प्रशासनाचे व शासनाचे होत असणारे दुर्लक्ष, त्यामुळे अंगणवाडी सेविकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**(६) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील वर्सोवा येथील मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे "शहाजी राजे क्रीडा संकुल" (अंधेरी स्पोर्टस् क्लब) हे १९८८ साली "ना नफा ना तोटा" या तत्वावर युनायटेड मार्केटींग रिसर्च बुरो (युएमआरबी) या खाजगी संस्थेस चालविण्यास देण्यात येणे, उक्त कंपनीमार्फत विविध खेळ बंद करण्यात येऊन खळाडूंसाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नसणे, नियमांचे उल्लंघन करुन लग्न समारंभ, राजकीय कार्यक्रम यातून पैशांच्या कमाईचे साधन केल्याचे निदर्शनास येणे, तसेच बाहेरुन येणाऱ्या खेळाडूंकरिता निवासासाठी ५६ खोल्यांचे वसतीगृहाचे थ्री स्टार हॉटेल बनविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, क्रीडा संकुलात ज्येष्ठ नागरिकांच्या मॉर्निंग वॉकसाठी केवळ सात ते साडेआठ एवढीच वेळ ठेवली असणे, संकुलातील स्विमिंगपूलाचीही दुरावस्था झाली असणे, सदर कंपनीच्या विरोधात अनेक तक्रारी असूनदेखील पुन्हा एकदा त्याच कंपनीला परवाना देण्यासाठी महापालिकेकडून घाट घातला जात असणे, तरी महापालिकेच्या १४ एकर जागेवरील क्रीडा संकुलाचे परवाने रद्द करुन सदर संकुलाचे खाजगीकरण करून घोटाळे करणाऱ्या संबंधितांवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

**(७) सर्वश्री. अमित देशमुख, धिरज देशमुख, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री. सुनिल केदार, रोहित पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"प्रत्येक शहराची ओळख ही त्या शहराच्या स्वच्छतेवरुन होत असून याला लातूर शहर अपवाद ठरत असल्याचे निदर्शनास येणे, लातूर महानगरपालिकेच्या गलथान कारभारामुळे शहरात अनेक भागात घाणीचे साम्राज्य निर्माण होणे, लातूर शहर बस स्थानक मेन रोड परिसरात मनपा प्रशासनाकडून नाली खोदण्यात आली असून ती आहे त्याच अवस्थेत असणे, त्यामुळे घाण पाणी सर्व परिसरात वाहणे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे, तसेच लातूर शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचा ढिग असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरणे, याचा त्रास नागरिकांना व बाहेर गावाहून येणाऱ्या नागरिकांना सोसावा लागणे, लातूर शहरात

दररोज १ टन घातक कचरा जमा होत असणे, परंतु घातक कचऱ्याचे संकलन करणे व त्यावर प्रक्रिया करण्यासंदर्भात सध्या तरी कसलीही यंत्रणा महापालिकेकडे नसणे, त्यामुळे शहरातील दररोजच्या १ टन घातक कचऱ्याचे होते काय ? या प्रश्नाचे उत्तर संबंधित यंत्रणेकडे नसणे, तसेच खाडगाव स्मशानभूमीपासून काही अंतरावर रिंगरोडलगत देखील मोठ्या प्रमाणात कचऱ्याचा ढिग तयार झाल्याचे दिसून येणे, तसेच काही ठिकाणी नाली साफ-सफाई करुन नालीतील कचरा वर काढून नालीच्या कडेला ठेवला जाणे, परंतु हा कचरा कोणीच उचलत नसल्याने दुर्गंधी सुटत असणे, काही दिवसांनी हाच कचरा पुन्हा नालीत पडत असून नाली तुंबल्या जाणे, तसेच नागरिकांकडून ओला व सुका कचरा विलग करुन दिला जात असतानाही घंटागाडीत टाकताना तो एकत्रच टाकला जाणे, त्यामुळे घरात कचरा विलग कशासाठी करायचा ? असा प्रश्न नागरिकांकडून केला जाणे, लातूर शहरातील नागरिकांकडून स्वच्छता कर, मालमत्ता व इतर कर लाखोंच्या प्रमाणात मनपा प्रशासन सक्तीने वसूल करीत असणे, पण नागरिकांना मुलभूत सुखसोयी व अडचणी दूर करण्यास मनपा प्रशासन अपयशी ठरत असणे, त्यामुळे राज्य शासनाने यासंदर्भात करावयाची कार्यवाही आणि त्यासंदर्भात करावयाच्या उपाययोजना."

**(८) सर्वश्री. अस्लम शेख, नाना पटोले, बाळासाहेब थोरात, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. अमीन पटेल, विजय वडेट्टीवार, संग्राम थोपटे, कुणाल पाटील, विकास ठाकरे, बळवंत वानखडे, संजय जगताप, डॉ.विश्वजित कदम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मालवणी, मालाड (पश्चिम) मुंबई येथे महानगरपालिकेचे मलनिस्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचे प्रस्तावित असून सन १९८३ पासून सदरचा प्रकल्प प्रलंबित असणे, मालवणी येथील सर्वे नंबर २६३ (पै.) रुपये सी.टी.एस नंबर २८४१ (पै.)मधील सुमारे ८३.६२ हेक्टर क्षेत्रफळाचा भूखंड मनपाच्या ताब्यात असून त्यापैकी फक्त ३५ हेक्टर जागेवर मलनिस्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने सदर जमिनीचा ताबा मालकी हक्कासाठी सन १९९४ साली सुमारे ६९,८६,६४०/- एवढ्या रकमेचा भरणा जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्याकडे केला असणे, मलनिस्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्रात क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे सुमारे ४०० एम.एल.डी सांडपाणी मालाड खाडीत सोडण्यात येत असणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर जलप्रदूषण निर्माण होऊन जलचर प्राणी मृत्युमुखी पडत असणे, त्यामुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम झाला असणे, परिणामी स्थानिक रहिवाशांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असून पर्यावरणाचा समतोल बिघडला असणे, पर्यावरणाचा धोका टाळण्यासाठी मालाड मलनिस्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्र तातडीने कार्यान्वित करणे आवश्यक असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशा निर्माण झालेला तीव्र संतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीच्या उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(९) श्रीमती जयश्री जाधव, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर जिल्ह्यातील शासन स्तरावरील विविध विकास प्रस्ताव तत्कालीन राज्य शासनाकडे सादर करण्यात आलेले असणे, त्यात प्रामुख्याने कोल्हापूर येथील राजर्षि शाहू महाराज यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जागेवर उभारणे, कोल्हापूर शहरातील शाहू मिलच्या सुमारे २६.८१ एकर जागेवर राजर्षी शाहु महाराजांचे यथोचित स्मारक करण्याची घोषणा तत्कालिन राज्य सरकारने दिनांक १८ डिसेंबर, २०२२ ला केलेली असणे, तसेच दिनांक ११ ऑक्टोबर, २०१३ मध्ये सुमारे ५ कोटी व दिनांक ८ जानेवारी, २०१३ रोजी १ कोटीचा निधी शासनाने जाहीर केल्याचे निदर्शनास आले असणे,परंतु सदर शाहू मिलची जागा राज्याच्या वस्त्रोद्योग महामंडळाच्या ताब्यात असल्याचे उघडकीस आले असणे, सदरील जागा विनामुल्य कोल्हापूर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यासाठी शासनाने अद्याप कोणतीही कार्यवाही किंवा उपाययोजना केल्याचे दिसून येत नसणे, तसेच उपरोक्त शाहू मिल विकास आराखडा यासाठी महानगरपालिकेने सुमारे ४०० कोटीचा प्रस्ताव तयार करुन तो शासनास सादर केला असल्याचे निदर्शनास आले असणे, परंतु शासनाने अद्याप कोणतीही कारवाई सदर प्रस्ताव प्रकरणी केली नसल्याने, सदर प्रस्ताव प्रलंबित असणे, तसेच छत्रपति शाहू महाराज यांच्या उपरोक्त प्रस्तावास शासनाने मान्यता दिली नसल्याने शासनाने जागतिक पातळीवर आपल्या कार्याचा ठसा उमटवलेल्या आदर्श राजाच्या स्मारकाची परवड करत असल्यामुळे संपूर्ण शाहू प्रेमी व सर्व जातधर्माच्या लोकांमध्ये असंतोष निर्माण होत असणे, तसेच शासनाने तातडीने उपरोक्त छत्रपति शाहू महाराजांच्या स्मारकाचे काम सुरू करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून शासनाकडे अनेकदा करण्यात आलेली असणे, परंतु शासनाने सदर प्रकरणी निधीबाबत केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कोल्हापूरवासीयांची शासनाच्या प्रती वाढलेली तीव्र संतापाची लाट, त्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(१०) सर्वश्री. प्रकाश सोळंके, शांताराम मोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सन १९९१ साली छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील वाळुंज अधिसुचित क्षेत्राकरीता सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन नेमणूक होणे, प्रकल्पातील जमिन मालकांच्या जमिनी ३० वर्षापासून संपादनाच्या छायेत असणे, प्रकल्पासाठीची भूसंपादन कार्यवाही २७ वर्षांपासून प्रलंबित असणे, शासनाने सन २०२२ च्या हिवाळी अधिवेशनात व सन २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दाखल झालेल्या लक्षवेधीकरिता दिलेल्या आश्वासनानुसार मा.मुख्यमंत्री यांनी मार्च २०२३ मध्ये बैठक घेऊन सिडको व जिल्हाधिकारी, छ.संभाजीनगर यांना १ महिन्याच्या आत

भुसंपादनासाठी प्रलंबित १२४.४० हेक्टर क्षेत्रापैकी ७.३६ हेक्टर क्षेत्राचे संपादन पूर्ण करुन उर्वरित क्षेत्र संपादनातून वगळण्याचे निर्देश देणे, १ महिन्याच्या आत विकास कामे केलेले ७.३६ हेक्टर जमिनीच्या मोबदल्याचा दर ठरविणे, ६ महिन्यांच्या आत भौतिक व सामाजिक सेवा –सुविधा (रस्त्यांसह) पूर्ण करणे असे निर्देश दिलेले असणे, परंतु वरील विहित मुदतीत कोणतेही कार्य सिडको व जिल्हाधिकारी यांच्या कडून न होणे, मा.मुख्यमंत्री व शासन यांनी घेतलेल्या निर्णयावर पुन्हा निर्णय घेण्यासाठी संचिका दोन महिने सिडकोचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी विनाकारण प्रलंबित ठेवणे, जमिन संपादनातून वगळणेसाठी पुन्हा शासनाची मान्यता घेण्याचे नावाखाली जाणिवपूर्वक जमिन धारकांची अडवणूक करुन जमिनी संपादनातून वगळण्यास दिरंगाई करणे, मा. मुख्यमंत्री व शासन यांनी घेतलेल्या निर्णयावर जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून हेतुपुरस्सर प्रश्नचिन्ह निर्माण करणे, प्रलंबित भूसंपादनातून वगळावयाच्या जमिनींना विकास परवानगी देण्याची कार्यवाही हेतुपुरस्सर अडवून याबाबत अद्याप प्रशासकीय निर्णय झाला नसल्याचे सिडकोकडून जमिन धारकांना उत्तर देण्यात येणे, मा.उच्च न्यायालयाने आरक्षण व्यपगत झाल्याचे जाहिर केल्यानंतरही, सदर आदेशांचे पुनर्विलोकन करण्याच्या नावाखाली सिडकोकडून विकास परवानगी देण्यासाठी अडवणूक करण्यात येणे, सिडको समाधानकारकरित्या प्रकल्प पूर्ण करेल आणि सेवा – सुविधा रस्ते यांच्याकरिता आवश्यक असलेल्या जमिनींचे संपादन आणि त्याचा विकास सिडको निश्चितच करणार आहे असे सभागृहास आश्वासन दिलेले असणे, परंतु त्या प्रमाणे प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही होत नसणे, प्रकल्पातील जनतेला सेवा – सुविधांची पुर्तता होण्यासाठी वारंवार आंदोलने, मोर्चे, उपोषण करावे लागणे, त्यासाठी मा.उच्च न्यायालयात दाद मागावी लागणे, प्रकल्पातील सर्व सेवा –सुविधा पुर्ण करण्याचे चित्र दाखवून सामान्य जनतेस सिडकोने भूखंडाची विक्री करणे, पुर्वी प्रल्पातील जमिन मालकांकडुन प्रकल्पाच्या पायाभुत सुविधांच्या विकास कामांसाठी त्यांची २५ टक्के जमिन संपादित केलेली असणे, परंतु त्यांना आश्वासित केलेल्या पायाभूत सुविधा न देता तसेच सेवा-सुविधांचा विकास झाल्यानंतरच सदर प्रकल्प अन्य प्राधिकरणांस हस्तांतर करण्याचे मा. मुख्यमंत्री यांच्याकडील बैठकीत स्पष्टपणे ठरले असताना सेवा सुविधांचा विकास पुर्ण न करता प्रकल्प हस्तांतरणाची घाई करण्यात येणे, आज रोजी सदर प्रकल्पासाठी अन्य कोणतेही सक्षम प्राधिकरण नसणे, सभागृहात दिलेले आश्वासन आणि शासनाचा निर्णय यावर हेतुपुरस्सरपणे कार्यवाही न होण्यामुळे भुधारकांमध्ये शासन, सिडको यांच्या बदल अविश्वासाचे वातावरण निर्माण होऊन शासन, सिडकोची प्रतिमा मलिन होणे, त्यामुळे सभागृहास दिलेले आश्वासन आणि शासनाच्या निर्देशांचे पालन करण्याची आणि संपादनाच्या फेऱ्यात अडकलेल्या जमिन मालकांना त्यांच्या जमिनीच्या विकास कामासाठी तत्काळ परवानगी देणेसाठी सिडकोने निर्देश देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

अस्सुधारित प्रत

**(११) श्री. संजय सावकारे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"भुसावळ शहरातील पाणी पुरवठा यंत्रणाही सुमारे ६५ वर्षापूर्वीची असणे, सध्या ती कालबाह्य झालेली असणे, पाण्यावर कुठलीही प्रक्रिया केली तरी ती उपयोगी ठरत नसणे, वारंवार पाइप लाईनची दुरुस्ती करावी लागणे, केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान भुसावळ शहर पाणी पुरवठा योजनेची अंदाजपत्रिकी किंमत रक्कम रु.९०.८४ कोटी प्रस्तावास शासनाव्दारे प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमण्यात येणे, मंजूर योजनेच्या उभारणीसाठी निविदा मंजूर करण्यात येणे, कामाचे कार्यादेश दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी देण्यात येणे, तापी नदी लगत उदभवाची निश्चित करून देण्यात येणे, योजनेत अनेक त्रुटी राहून जाणे, जसे शहरातील काही भाग सोडून देणे, पाण्याचा उद्भव ऐनवेळी बदलणे, नळजोडणी गृहीतच न धरणे, ४८ महिन्यांचा कालावधी लोटूनही सुधारित पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने शासनाकडे प्रशासकीय मंजुरीकरिता सादर करण्यास आलेले अपयश सद्य:स्थितीत योजनेचे काम बंद असणे, सद्या १५ दिवस आड पिण्याचे पाणी भुसावळकराना मिळत असल्यामुळे जनतेत पसरलेली असंतोषाची भावना, गत अधिवेशनात जळगाव शहर व भुसावळ शहरातील अमृत योजनेबाबत बैठक घेण्याचे मा. मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन देणे, आजपर्यंत बैठक न घेणे, वेळोवेळी सभागृहात सदर समस्या प्रश्नाच्या माद्यामातून उपस्थित करण्याचा प्रयत्न करणे, विनंती अर्ज सभागृहात सादर करणे, मात्र पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यास शासनाला आलेले अपयश, त्यामुळे लोकांमध्ये पसरलेला प्रचंड असंतोष व नाराजी, यावर शासनाने करावयाची कारवाई आणि उपाययोजना."

**(१२) श्री. अमित झनक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"वाशिम जिल्ह्यातील मालेगाव येथील ग्रामपंचायत मधून दिनांक १७ जुलै, २०१५ ला नगरपंचायत अस्तित्वात आली असून शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती मालेगाव वाढीव पाणीपुरवठा योजना रुपये ४७ कोटी १५ लक्ष रुपयांची प्रलंबित असणे, या योजनेबाबत माननीय संचालनालय, मुंबई यांच्याकडे त्रुटी पूर्तता केली असून मालेगाव शहराला पिण्याच्या पाण्याची आवश्यकता असल्याने ही योजना फार उपयोगी असणे, या योजनेचे पाणी आरक्षण सन २०२४-१.८१५ द.ल.घ.मी. सन २०३९-२.३५१ द.ल.घ.मी. सन २०५४-३.०२६ द.ल.घ.मी., सदर पाणीपुरवठा योजना ही चाकातीर्थ धरणातून प्रस्तावित असणे, सदर योजनेकरिता वरील प्रमाणे ३.०२६ द.ल.घ.मी. पाणी लागत असणे, ही मंत्रालय विभाग स्तरावर प्रलंबित असणे, मालेगाव, जिल्हा वाशिम येथील पाणीपुरवठा योजना अशी येथील जनतेची मागणी

अग्रिम प्रत

असताना वा त्यावरील कारवाई करण्यास शासनाकडून होत असलेला विलंब, त्यामुळे जनतेमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१३) सर्वश्री. शिरीष चौधरी, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या मनमानी कारभाराच्या तक्रारी व घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये सर्वप्रथम जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड येथे कार्यरत असताना त्यांनी अपंग शाळा व विशेष शाळांमधील एकूण ६४ कर्मचाऱ्यांची पदे भरण्यास अनियमितपणे मान्यता दिलेली असणे, यांचे विरुद्ध तक्रार दाखल होऊन देखील प्रत्यक्षात अहवाल सदर करण्यास तत्कालीन आयुक्त दिव्यांग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कळवून देखील सादर न करणे, यामुळे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई होण्याबाबतची शिफारस स्वतः मा.आयुक्त यांनी केलेली असणे, तसेच एका प्रकरणात तर चक्क सदर समाज कल्याण अधिकारी यांनी एका २३ वर्षीय तरुणीकडे अनुकंपा तत्वावर नोकरीची ऑर्डर देण्यासाठी पैसे न दिल्याबद्दल शरीर सुखाची मागणी केल्याची धक्कादायक घटना निदर्शनास येणे, यासंदर्भात देखील गुन्हा दाखल होऊन त्याविरुद्ध कुठलीही कारवाई झालेली नसणे, तसेच एका प्रकरणामध्ये दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडून वितरित केलेल्या नियमित वेतनाच्या निधीची अद्यावत माहिती सादर न करता सदर निधी इतरत्र ठिकाणी वापरल्याची घटना देखील घडणे, याबाबत माननीय आयुक्त दिव्यांग कल्याण यांनी त्यांचेविरुद्ध प्रशासकीय कारवाई का करण्यात येऊ नये तसेच याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करण्यास सांगून देखील जाणून-बुजून दिरंगाई करण्यात येत असणे, तसेच त्यांच्या कार्यालयात गेले असता नागरिकांना जाणून-बुजून ताटकळत ठेवण्यात येणे, त्यांच्याकडून वारंवार छोट्या-मोठ्या कामांसाठी पैशाची मागणी करण्यात येत असल्याची तक्रार माननीय प्रदेश उपायुक्त समाज कल्याण विभाग यांना अनेक नागरिकांनी केलेली असणे, असे असताना देखील त्यांचे विरुद्ध अद्यापपर्यंत कोणत्याच प्रकारची कार्यवाही झालेली नसणे, यामुळे येथील नागरिकांमध्ये सदर विभागाविरुद्ध व प्रशासनाविरुद्ध मोठ्या प्रमाणावर नाराजीचे व असंतोषाचे प्रमाण पसरलेले असणे याबाबत शासनाने त्यांना वरील प्रकरणी त्वरित निलंबित करून त्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबतची शासनाने करावयाची कारवाई."

**(१४) सर्वश्री. विजयकुमार देशमुख, अभिमन्यु पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र शासन सामाजिक अर्थसहाय्य योजना (संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ राज्यसेवा निवृत्तीवेतन योजना) सन १९८० पासून राबविण्यात येत असणे, सामाजिक अर्थसहाय्य योजनांमध्ये महाराष्ट्रात सध्या ३२ लक्ष लाखा पेक्षा

जास्त लाभार्थ्यांना लाभ दिला जात असून दरवर्षी सुमारे ४,००० कोटी रूपयाचे अनुदान महसूल विभागामार्फत लाभार्थ्यांना वाटप करण्यात येत असणे, सामाजिक अर्थसहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना दरमहा रू. १५००/- इतके आर्थिक सहाय्य केंद्र व राज्य शासनाचा संयुक्त सहभागाने वितरीत करण्यात येत असणे, सामाजिक अर्थसहाय्य योजनांतील लाभार्थ्यांना प्रत्यक्ष अनुदान वाटपाची कार्यवाही अजूनही पारंपरिक असून संबधित तहसिलदार यांचेमार्फत दरमहा सदर योजनेतील लाभार्थ्यांचे देयके तयार करणे, कोषागारात देयके मंजूरीस्तव सादर करणे व कोषागारातून देयके मंजूर झालेनंतर पुन्हा बँकेत लाभार्थ्यांच्या यादया व धनादेश पाठवणे व तद्नंतर बँकेमार्फत लाभार्थी यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्यात करण्याची कार्यवाही करण्यात येणे, लाभार्थ्यांना प्रत्यक्ष अनुदान वाटप करण्याची कार्यवाहीची प्रक्रिया खूप वेळखाऊ व अत्यंत खर्चिक असल्याने यात मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ, स्टेशनरी, इत्यादी साधनसंपत्तीचा वापर होत असणे, या योजनेतील अनुदान वाटपाच्या प्रक्रियेत बरेच वेळा आर्थिक गैरव्यवहार, अपात्र व दुबार लाभार्थी यांचा समावेश असणे, सामाजिक अर्थसहाय्य योजनांतील लाभार्थ्यांना अनुदान वाटप संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून केल्यास लाभार्थी यांच्या खात्यात अनुदान पी एम किसान योजनेच्या धर्तीवर ऑनलाईन जमा करण्याची कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, सामाजिक अर्थसहाय्य योजनांतील लाभार्थी यांना दरमहा लाभ वाटपाची कार्यवाही मा मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत एका क्लिकवर ऑनलाईन झाल्यास महाराष्ट्रातील दिव्यांग, निरश्रीत असणाऱ्या ३२ लक्षपेक्षा अधिक लाभार्थी यांना शासनामार्फत दरमहा किंवा उपलब्ध निधीनुसार निश्चित तारखेस वाटपाची कारवाई या वृध्द निराधार विधवा दिव्यांग नागरीकांच्या सोयीचे होणार असणे, तसेच या योजनेच्या मंजुरी व अनुदान वाटपात पारदर्शकता येणार असून कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय लाभार्थ्यांच्या खात्यात धनादेश प्रत्यक्ष जमा होणार असल्याने या योजनेच्या लाभार्थ्यांची अर्थिक पिळवणूक थांबणार असणे, राज्यातील सामाजिक न्याय विभागाची सदरील योजना ही पी. एम. किसान च्या धर्तीवर सुरू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(१५) सर्वश्री. प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. अमित साटम, महेश बालदी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्यांमार्फत रात्री अपरात्री तसेच पहाटेच्या वेळी सोडण्यात येणाऱ्या रासायनिक दुषित वायु व दुषित पाण्यामुळे पनवेल तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागात मोठया प्रमाणात प्रदुषणात वाढ झाली असल्याचे माहे जुलै, २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, उक्त परिसरातील अनेक कारखानांतून सोडण्यात येणाऱ्या रासायनिक घातक वायुमुळे प्रदुषणात वाढ होवून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असणे, अनेक

रासायनिक कंपन्यांमार्फत उक्त परिसरातील नद्यांमध्ये सोडण्यात येणाऱ्या रसायन मिश्रीत दुषित पाण्यामुळे नदी प्रदुषित होऊन मोठया प्रमाणात मासे मृत पावत असून भात शेती नापिक होत असणे, उक्त परिसरातील वाढत्या प्रदुषणासंदर्भात वारंवार शासनाच्या निदर्शनास आणुनसुद्धा शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे अद्ययावत यंत्रणा नसल्यामुळे रासायनिक कारखान्यांमार्फत सोडण्यात येणाऱ्या रसायन मिश्रित पाण्याची वेळोवेळी तपासणी न केल्यामुळे मोठया प्रमाणात मासे मरून व भातशेतीचेही नुकसान होत असणे, पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या उक्त औद्योगिक वसाहतीतील रासायनिक कारखान्यांवर कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे नागरिकांच्या मनात संबंधित विभागाबाबत चिड निर्माण होणे, या कारणास्तव शासनाने रासायनिक मिश्रीत पाण्याची तपासणी करण्यासाठी अद्ययावत यत्रंणा उभारून दुषित वायु सोडणाऱ्या कारखान्यांवर तसेच उक्त परिसरातील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची नितांत गरज, त्यादृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१६) श्री.रोहित पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"आठव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात महाराष्ट्रात नवीन सहकारी सूतगिरण्यांना मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता त्यानुसार प्रबोधनकार ठाकरे विणकर सहकारी सूतगिरणी मर्यादित सोलापूर जिल्हा सोलापूर या गिरणीस दिनांक १७ मार्च, १९९७ च्या शासन निर्णयान्वये आठव्या पंचवार्षिक योजनेत समावेश करून शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यास मान्यता दिलेली असणे, याच काळात आठव्या पंचवार्षिक योजनेत समाविष्ट असलेल्या बऱ्याच सहकारी सूतगिरणी प्रकल्प उभारणीबाबत कारवाई सुरू केली परंतु प्रबोधनकार ठाकरे विणकर सहकारी सूतगिरणी मर्यादित सोलापूर या सूतगिरणीने नोंदणी कालावधी पासून २१ वर्षांचा कालावधी पूर्ण होऊनही प्रकल्प उभारणी बाबत प्रगती न केल्यामुळे सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ (१) क एक व चार मधील तरतुदीनुसार वस्त्रोद्योग संचालनालय यांनी दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी गिरणी औसायनात काढण्याबाबतचा आदेश निर्गमित करणे, दिनांक २ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रबोधनकार ठाकरे विणकर सहकारी सूतगिरणी मर्यादित सोलापूर या सूतगिरणीचा आठव्या पंचवार्षिक योजनेत समावेश करून शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आली असणे, संदर्भीय शासन निर्णयानुसार सदरहू सूतगिरणीचे शासकीय अर्थसहाय्य देण्यासाठी नव्याने निवड करण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली असणे, त्यानंतर शासन पत्र दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ अन्वये सदर सुतगिरणीच्या तालुका कर्जत जिल्हा अहमदनगर येथे स्थलांतरणास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येणे, दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी च्या सहकार व पणन वस्त्रोद्योग

अप्रकाशित प्रत

विभागाच्या शासन निर्णयान्वये प्रबोधनकार सहकारी सूतगिरणीच्या सुधारित प्रकल्प अहवालास (किंमत ६१७४.२४ लक्ष) मान्यता दिलेली असणे, तसेच सदर सुतगिरणीने रुपये १२३ लक्ष इतके सभासद भाग भांडवल जमा करणे सदर सूतगिरणी दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये ९ कोटी रुपये इतके अनुदान वितरित करण्यात आलेले असणे, प्रबोधनकार ठाकरे सहकारी सूतगिरणीचे कर्जत येथील स्थलांतरण, प्रकल्प अहवालास मान्यता, अनुदान वितरण ही सर्व कारवाई अवघ्या दिनांक ४ सप्टेंबर, २०१९ ते १८ सप्टेंबर, २०१९ या केवळ पंधरा दिवसाच्या कालावधीत अतिवेगवान पद्धतीने शासनाने घेतलेला हा निर्णय असणे, सदर सूतगिरणीच्या कामकाजावर व प्रकल्प उभारणीवर लक्ष देऊन प्रगतीचा तिमाही अहवाल आयुक्त, वस्त्रोद्योग यांनी वेळोवेळी शासनास सादर करण्याचे व प्रस्तुत सूतगिरणीसंदर्भात शासन निर्णयामधील तरतुदीनुसार वसुलीबाबत आयुक्त, वस्त्रोद्योग यांनी काटेकोरपणे कारवाई करणे गरजेचे असणे, सदर सुतगिरणीकडे बँकेत जमा असलेल्या निधीचे नियोजन करून विनियोजन योग्य रीतीने होत असल्याची खात्री माननीय आयुक्त वस्त्रोद्योग यांनी वेळोवेळी करण्याची अट बंधनकारक असणे, शासन निर्णयामुळे सूतगिरणीची उभारणी विहित कालमर्यादेत पूर्ण करणे गरजेचे असतानाही सद्यस्थितीत प्रकल्प उभारणीचे कुठलेही काम झालेले नसणे, परिणामी शासनाच्या अनुदानात अपहार झालेल्यांची शंका निर्माण होणे, संस्थेचे लेखापरीक्षण करून प्रकल्प उभारणीत झालेली दिरंगाई व झालेला गैरव्यवहार तसेच शासनाची केलेली दिशाभूल याबाबत शासनाची भूमिका करावयाची कारवाई."

**(१७) श्री.समाधान अवताडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील काही ग्रामपंचायत हद्दीतील गावठाण व गायरान जमिनी परस्पर वनविभागाच्या ताब्यात असल्याचे निदर्शनास येणे, तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या कार्यकाळात सन २०१६ ला शासनाचे कोणतेही आदेश नसतांना किंवा तशी मागणी नसतांना परस्पर मंगळवेढा व पंढरपूर तालुक्यातील जवळपास २ हजार एकर पेक्षा जास्त जमीन वनविभागास हस्तांतरित केली असणे, सदर जमीन हस्तांतरित करत असतांना सदर ग्रामपंचायत किंवा खाजगी शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची नोटीस दिलेली नसणे, वनविभागाने सदर जमिनीवर परस्पर कुंपण घातल्यामुळे सदरचा प्रकार उघडकीस येणे, यामुळे येथील स्थानिक नागरिकांच्या व शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनावर प्रतिकूल परिणाम होणे, सदरच्या जमिनी मागील बऱ्याच कालावधीपासून या खाजगी किंवा शासकीय असल्याने यावर ग्रामपंचायत दफनभूमी, स्मशानभूमी, पिण्याच्या पाण्याची योजना व गेली ४० वर्षापासून गोरगरिबांची रहात असलेली घरे असे अनेक सार्वजनिक हिताच्या बाबी असणे, परंतु अचानक सदरच्या जमीन वनविभागाच्या ताब्यात गेल्यामुळे सदर योजनांचा किंवा सार्वजनिक बाबींचा प्रत्यक्षात उपभोग घेता येत नसणे, तसेच

शासकीय गायरान जमिनीवर अनेक वर्षांपासून तेथे राहत असलेल्या स्थानिकांना घरकुल मिळून देखील सदर जमीन वनविभागात गेल्यामुळे त्यांना प्रत्यक्षात त्यांच्या हक्काच्या घरकुलापासून वंचित रहावे लागत असणे, तसेच सदर जमिनीवर असलेल्या सार्वजनिक बाबींचा वापर करायला गेल्यास वनविभागाच्या वतीने तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात येणे, यामुळे येथील स्थानिक नागरिकांना व शेतकऱ्यांना नाहक मनस्ताप होत असणे, याकरीता तत्कालीन जिल्हाधिकारी सोलापूर यांनी परस्पर हस्तांतरित केलेल्या जमिनी शासनाने त्वरित विभागाकडून काढून स्थानिक शेतकरी अथवा ग्रामपंचायत यांच्या नावावर करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१८) श्री. दिलीप लांडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राष्ट्रीय महामार्गापासून केवळ १० कि.मी. अंतरावर असलेल्या भोर तालुक्यातील (जि.पुणे) सहयाद्रीच्या पर्वत रागांच्या प्रदेशात डोंगरपायथ्याशी वसलेल्या मौजे मोहरी, सणसवाडी, हातवे आणि तांभाड गावांमधील डोंगर उतारावर भूमाफिया, विकासक आदींनी मागील काही वर्षांपासून अनधिकृत उत्खनन करून रिसॉर्ट, बंगले आदी अनधिकृत बांधकाम करून निसर्गांचा ऱ्हास केलेला असणे, सदरहू उत्खननासाठी शासकीय नियमांचे झालेले उल्लंघन, शासनाने पश्चिम घाट जैवविविधता संदर्भात नेमलेल्या माधव गाडगीळ समितीचे अहवालातील शिफारशीचेही उल्लंघन झालेले असणे, त्याचप्रमाणे शासनास सदर अहवाल सादर केलेला असतानाही आजमितीस शासनाकडून माधवराव गाडगीळ समितीच्या अंमलबजावणीबाबतही कोणतीही कारवाई झालेली नसणे, सर्रासपणे डोंगर उतार फोटून प्रचंड प्रमाणावर उत्खनन झाल्यामुळे माळीण दुर्घटनेत १८७, तळीये दुर्घटनेत ८७ गावकऱ्यांचा मृत्यू होणे तसेच अलीकडेच दिनांक २० जुलै, २०२३ रोजी दरड कोसळून इर्शाळवाडी येथील २७ गावकऱ्यांचा मृत्यू होणे व करोडो रुपयांची घरे इतर मालमत्ता आदींचे झालेले नुकसान, राष्ट्रीय हरित प्राधिकरण, पुणे यांचा डोंगर माथ्यावर व टेकडीच्या उतारावर बांधकामास परवानगी नसतानाही विकासकांनी व भूमाफियांनी शासनाच्या दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या शासकीय आदेशाला तिलांजली दिलेली असणे, त्याकडे संबंधीत शासकीय विभागाकडून आजमितीस झालेले दुर्लक्ष व टाळाटाळ, परिणामत: सध्या सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे डोंगर उतारांवरून मोठ्या प्रमाणात मातीचा ढीग खाली येवून आणखी एक मोठी दुर्घटना घडून मोठ्या प्रमाणात जीवितहानी होण्याची शक्यता, वेल्हे तालुक्यातील डोंगर उताऱ्यावरील गोरगरीब ग्रामस्थांच्या अज्ञानाचा फायदा घेत कवडीमोल भावाने जमिनी विकत घेऊन केलेले बांधकाम, यामुळे सदरहू परिसर हिलझोन म्हणून या भूभागांना मान्यता दिलेली असतानाही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून झालेली अनधिकृत बांधकामे, यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीनी तसेच चांदिवली विधानसभा मतदारसंघाचे

अग्रिम प्रत

लोकप्रतिनिधीनी दिनांक २१ फेबुवारी, २०२२ रोजी मा. मुख्यमंत्र्याकडे सविस्तर रीत्या निवेदन सादर करून या गैरप्रकाराबाबत सखोल चौकशी होऊन सर्व संबंधीत दोषी तसेच संबंधीत अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने विनाविलंब करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(१९) श्री. विनोद निकोले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे तलासरी व डहाणू, जि. पालघर येथील संरक्षित व राखीव वन विभागातून एका कंपनीमार्फत टाकण्यात आलेल्या ऑप्टीकल फायबर केबल (ओ.एफ.सी.) बाबत सखोल चौकशी होऊन कारवाई होणे बाबत स्थानिक लोक प्रतिनिधींव्दारे मा.उप वनसरंक्षक वन विभाग डहाणू, (ता.डहाणू, जि.पालघर) यांना दिनांक २८ जून, २०२३ रोजीच्या सुमारास लेखी निवेदन देण्यात येणे, सदर कंपनीने संबंधीत वन विभागाच्या कार्यालयाची परवानगी न घेणे, अशा प्रकारे वन विभागाची परवानगी न घेता सदर केबल टाकल्याप्रकरणी संबंधीत कंपनीवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच, मौजे विवळवेढे (महालक्ष्मी), ता. डहाणू, जि. पालघर येथील भूमापन क्र. व उपविभाग ४०/१, क्षेत्र ३-०६-० हे. आर. पैकी १२०० हे. आर या जमिनीबाबत दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ रोजी केलेल्या कराराच्या हरकती याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधींनी जिल्हाधिकारी पालघर, ता.जि.पालघर व उक्त संबंधीत अधिकारी यांना माहे जून, २०२३ च्या सुमारास लेखी निवेदन देण्यात येणे, सदर करारावर स्वत:ची स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा नसताना त्या करारामध्ये दर्शविण्यात येणे, या संदर्भात संबंधीत तक्रारदार यांनी संबंधित कार्यालयामध्ये लेखी स्वरूपात व समक्ष जाऊन तक्रारी करणे, या संदर्भात संबंधीत अधिकाऱ्यांनी अर्थपूर्ण व्यवहार करून कोणतीच चौकशी वा कारवाई न करणे, परिणामी या आदिवासी कुटूंबाच्या अज्ञानाचा फायदा घेवून फसवणूक करण्यात आल्याने त्यांच्यात निर्माण झालेले नैराश्याचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची नितांत गरज, तसेच या आदिवासी कुटूंबियांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

**(२०) सर्वश्री. शिरीषकुमार नाईक, सुनिल प्रभू, बाळासाहेब थोरात, नाना पटोले, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, सुरेश वरपुडकर, अस्लम शेख, विकास ठाकरे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री. बळवंत वानखडे, संजय जगताप, कुणाल पाटील, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री. विक्रमसिंह सावंत, शिरीष चौधरी, राजेश एकडे, सुभाष धोटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

अग्रिम प्रत

"नंदूरबार जिल्हयातील ११०४ रस्त्यांच्या कामांबाबत मा. उच्च न्यायालयाचे संबंधित कामांचे व्हिडिओ चित्रीकरण करुन चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश मा. जिल्हाधिकारी यांना माहे जून, २०२३ च्या दरम्यान दिले असल्याचे उघडकीस येणे, शासन निर्णयानुसार आदिवासी विकास विभागाअंतर्गत नंदूरबार जिल्हयासाठी ३२६ कोटी रुपयांचे अनुदान रस्त्यांच्या कामांसाठी मंजूर केले असणे, त्यातील ७५ कोटी २५ लाख रुपये जिल्हा परिषदेकडे वितरीत करण्यात आले असणे, जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना जिल्हा परिषदेने वेळेवर या प्रकरणाच्या नस्त्या (कागदपत्रे) उपलब्ध करुन न देणे, सदरची १०३ कामे न करता कामांची बिले काढून घेत असल्याची बाब निदर्शनास येणे, प्रत्येक १०१३ कामांची प्रत्येकी ५ लाख ३४ हजार इतकी रक्कम कामे न करता काढून घेणे, या कामांमध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस आल्याने व रस्त्यांची कामे पूर्ण न झाल्याने ग्रामीण भागातील जनमानसात पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, सबब, या भ्रष्टाचार प्रकरणी दोषी असलेल्यांची एसआयटी कडून सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(२१) डॉ. किरण लहामटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे घाटघर ता.अकोले जि.अहमदनगर येथील प्राथमिक आरोग्य पथक इमारत व निवासस्थानाची ईमारत पावसाच्या पाण्यामुळे गळत असणे, प्राथमिक आरोग्य केंद्र पथक इमारत तसेच कर्मचारी निवास इमारत राहण्यायोग्य नसणे, इमारतीचे काम कित्येक वर्षापासून सुरु असणे,संबंधित कामाची बिले अदा झालेली असणे, संबंधित बांधकाम ठेकेदार यांची कामे बऱ्याच ठिकाणी निकृष्ट दर्जाची असणे, येथील आरोग्य सेवा कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी, नर्स यांना निवासस्थानाची व्यवस्था नसणे, परिणामी त्यांना रुग्णसेवा देणे अवघड जात असणे, रुग्णांची हेळसांड होत असणे, रुग्ण तपासणीसाठी व ॲडमिट करण्यासाठी बिलकुल जागा नसणे,या ठेकेदारांना कित्येक वेळा शासनाच्या संबधित विभागाकडून नोटीसा काढूनही ठेकेदाराने दाद न देणे, या सर्व परिस्थितीला जबाबदार असणाऱ्या दोषींवर काय कार्यवाही करणार, किती दिवसात काम पूर्णत्वास जाणार, सध्य परिस्थितीत तिथे काय उपाययोजना करणार, याबाबत शासनाची भूमिका व करावयाची उपाययोजना."

**(२२) श्री. वैभव नाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मालवण तालुक्यातील वरची गुरामवाडी ग्रामपंचायतीने जुलै, २०१९ मध्ये कट्टा बाजारपेठ विकसित करणे या नावाने विकासकामाचा प्रस्ताव मालवण गटविकास अधिका-यांमार्फत सिंधुदुर्ग जिल्हा परिषद सीईओकडे पाठविलेला असणे, जनसुविधा योजनेंतर्गत सदर प्रस्तावास मंजूरी मिळणे, या प्रस्तावाखाली ९ लाख ९९ हजार ६२८

रुपयांचे अंदाजपत्रक सादर करण्यात येणे, या प्रस्तावात इतर आवश्यक कागदपत्रांसोबत कट्टा येथील भूमापन क्रमांक २१/१७ ब चा ७/१२ उतारा जोडलेला असणे, सप्टेंबर, २०१९ मध्ये या कामाला मंजूरी मिळालेली असून १५ मार्च, २०२० पर्यंत काम पूर्ण करण्याची मुदत देण्यात येणे, परंतू सदर ठिकाणी मार्च, २०२१ पर्यंत कोणतेही बांधकाम करण्यात आलेले नसणे, तद्नंतर मार्च, २०२१ मध्ये पुन्हा वरची गुरामवाडी ग्रामपंचायतीने आठवडा बाजार केंद्र उर्वरित बांधकाम या नावाने विकासकामाचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे सादर करणे, विशेष म्हणजे आवश्यक कागदपत्रासोबत पुन्हा एकदा कट्टा येथील भूमापक क्रमांक २१/१७ ब चा ७/१२ उतारा जोडलेला असणे, तथापी आठवडा बाजारासाठी १९ लाख ९७ हजार ४०८ रुयांच्या अंदाजपत्राकास मंजूरी मिळणे, त्यानंतर कामाची निविदा मंजूर करुन ३१ मार्च, २०२२ पर्यंत काम पूर्ण करण्याची मुदत देण्यात येणे, सदर जागेवर सद्यस्थितीत एकच ईमारतीचे बांधकाम केलेले असणे, याचाच अर्थ एकाच ७/१२ वर दोन शासकीय इमारती मंजूर करण्यात येणे, परंतू प्रत्यक्षात याठिकाणी एकच इमारत उभारलेली असणे, सदर इमारतीच्या बाहेर आठवडा बाजार केंद्र असा फलक लावण्यात येणे, त्यामुळे याठिकाणचे मच्छिमार्केट गायब झाल्याची तक्रार ग्रामस्थांनी जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्याकडे केलेली असणे, शासनाने यासर्व गैरव्यवहाराची चौकशी करुन दोषी आढळून येणा-या सर्व संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

**(२३) सर्वश्री. महेश बालदी, प्रशांत ठाकूर, अमित साटम, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भोकरपाडा येथे राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा केंद्रावरील ३४ वर्षापासून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या प्रलंबित असल्यामुळे कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, सदर कर्मचाऱ्यांना गेल्या १४ वर्षापासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत मानधन देण्यात येत असणे, उक्त कर्मचाऱ्यांना २००९ पासून शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळत नसणे, बोनस व अतिरिक्त वेळ काम केल्याचा पगार मिळत नसणे, सन २००९ ते २०१८ पर्यंतचा कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत भरला गेला नसणे, अशा अनेक प्रलंबित मागण्यांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाबाबत तीव्र असंतोष निर्माण झाला असणे, याबाबत शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण भोकरपाडा येथील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत तातडीने कार्यवाही करण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अमुद्रित प्रत

**(२४) श्री. प्रमोद पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत असलेल्या कल्याण-शीळ रस्त्यावरील पलावा चौक परिसरात वर्षानुवर्ष होणाऱ्या वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी दिनांक ३० डिसेंबर, २०१८ रोजी भुमिपूजन करण्यात येणे, या पुलाचा संपूर्ण आराखडा तयार नसतानही पहिला गर्डर टाकण्यात येणे, मात्र प्रत्यक्षात या पुलाच्या खाली येणारी अनधिकृत बांधकामे हटविण्यात न येणे, या कालखंडात रेल्वे पुलाचा अंतिम आराखडा सुद्धा मंजूर करण्यात आलेला नसल्याची वस्तुस्थिती स्पष्ट होणे, कालांतराने रेल्वे प्रशासनाकडून या पुलाची अंतिम डिझाईन काही महिन्यापूर्वी आलेली असणे, सदर पूल काटईच्या (डोंबिवलीच्या दिशेने ज्या) बाजूला उतरणार आहे तेथील भूसंपादन आजमितीस झालेले नसल्याची परिस्थिती, सदर पुलाखालील बाधित होणारी अनधिकृत बांधकामे वाचविण्यासाठी पूल क्र.२ संरेखन बदलण्याचे झालेले गैरप्रकार, सदर पुलाच्या उभारणीचे काम अत्यंत संथगतीने सुरू असून मागील अनेक वर्षापासून रखडल्याने पलावा चौक येथे सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे वाहन चालकांना सोसाव्या लागणाऱ्या अनेक गंभीर समस्या, परिणामतः त्यांच्यामध्ये पसरलेली संतापाची लाट व निर्माण झालेली व होत असलेली नाराजी, या संपूर्ण प्रकरणासंदर्भात कल्याण डोंबिवली महानगर पालिका तसेच एमएसआरडीसीकडे सातत्याने केलेल्या तक्रारी, त्याकडे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष व टाळाटाळ, पलावा पुलाच्या कामासाठी एमएसआरडीसी कामांमध्ये सदर अनधिकृत बांधकामे वाचविण्यासाठी सुरु असलेले प्रयत्न, संबंधित अधिकारी पुलाच्या संरेखानामध्ये गैररित्या बदल करीत असल्याची नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत असलेली शंका, सबब या संपूर्ण परिस्थिती संदर्भात गांभीर्याने विचार करून, मागील अनेक वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत रखडलेल्या पलावा चौक परिसरातील पुलाचे उभारणीचे काम, कोणत्याही दबावाला बळी न पडता तसेच या पुलाखाली असलेली सर्व अनधिकृत बांधकामे संपूर्णतः निष्कासित करून, योग्य प्रकारे नियोजन करून तातडीने पुलाचे काम हाती घेऊन युद्धपातळीवर पूर्ण करून, सदर पूल वाहतुकीसाठी कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस कारवाई करण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२५) श्री. श्यामसुंदर शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"दिनांक १ जुलै, १९९८ रोजी फलोत्पादन व मृदासंधारण या ०३ विभागाचे एकत्रिकरण करून ०१ खिडकी योजनेंतर्गत कृषी विभागाची पुनर्रचना करण्यात आली असणे, या आकृतीबंधानुसार प्रति १००० खातेदार संख्या अथवा १५० हेक्टर शेतजमिनी मागे ०१ कृषी सहाय्यक या प्रमाणात कृषी सहाय्यकांची पदे निश्चित

अप्रकाशित प्रत

करण्यात आली असणे, तथापि, दिनांक १ जुलै, १९९८ च्या तुलनेत खातेदारांच्या संख्येत कृषी योजनांच्या संख्येत आणि त्याच प्रमाणे खरीप / रब्बी / उन्हाळी हंगामातील वाहितीखालील क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली असणे, तरी कृषी सहाय्यकांच्या संख्येत वाढ झालेली नसणे, गाव पातळीवर महसूल विभागाचे तलाठी आणि ग्रामविकास विभागाचे ग्रामसेवक या कर्मचाऱ्यांसोबत कृषी सहाय्यकास नैसर्गिक आपत्ती सर्वेक्षण, शेतकरी कुटुंबांचे सर्वेक्षण, दारिद्र्य या पातळी खालील कुटुंबाचे सर्व सर्वेक्षण, निवडणूक, ग्रामसभा इत्यादी सर्व बाबतीत संयुक्तरित्या कर्तव्य पार पाडावी लागत असणे, मात्र संयुक्तरित्या तलाठ्यांचे अधिनस्त कोतवाल अथवा ग्रामसेवकांचे अधिनस्त पदस्थापित शिपाई पदाप्रमाणे कृषी सहायकांचे मदतीसाठी / कर्तव्यातील सहाय्यासाठी कोणताही पूर्णवेळ कर्मचारी अद्यापही गाव पातळीवर नियुक्त करण्यात आलेला नसणे, किंबहुना ग्रामसेवक व तलाठ्याप्रमाणे कृषी सहाय्यकास गाव पातळीवर कोणतेही स्वतंत्र कार्यालय नसणे, तसेच वाढत्या योजना खातेदार संख्येतील भरीव वाढ तसेच ऑनलाईन कामांचे वाढत्या स्वरूपामुळे कर्मचारी अधिकारी यांना प्रभावीपणे कार्य पार पाडण्यास असमर्थता दर्शविणे, सन १९९८ पासून आजपर्यंत कृषी सहाय्यकांच्या पदांमध्ये कोणतीही वाढ पुरवण्यात आलेली नसणे, कृषी सहाय्यकांच्या तुलनेत गाव पातळीवरील ग्रामसेवकांची तसेच तलाठ्यांची पदसंख्या ही लक्षणीयरित्या अधिक असल्याचे दिसून येत असणे, कंधार तालुक्यात दिनांक १ जुलै, १९९८ रोजी ११६ ग्रामपंचायतसाठी ६ महसूल मंडळ व ३६ तलाठी सज्जे असणे, त्यामध्ये वाढ करण्यात येऊन सन २०२३ मध्ये एकूण ०७ महसूल मंडळे व ४२ तलाठी सज्जे निर्मित करण्यात आले असणे, परंतु कंधार तालुक्यातील सन १९९८ मधील मंजूर ३६ कृषी सहाय्यक पदसंख्येत अद्यापपर्यंत कोणतीही वाढ करण्यात आलेली नसणे, उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता कृषी विभागांतर्गत कृषी सहाय्यकांची मंजूर पदसंख्या वाढविणे अत्यावश्यक असणे, जेणेकरून शेतकरी बांधवांपर्यंत कृषी विभागाच्या योजना प्रभावीपणे पोहोचणे शक्य असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२६) श्री. रईस शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"भिवंडी शहरामध्ये तसेच महाराष्ट्रामध्ये "असंघटित (गिग) कामगार हे ऑनलाइन प्लॅटफॉर्म मधील कामगार असणे, तसेच त्यांचा समाविष्ट कंत्राटी संस्थाचे कामगार, ऑन-कॉल कामगार, तात्पुरते कामगार मध्ये असणे, कामगार कंपनीच्या मागणीनुसार कंपन्यांशी औपचारिक करार करत नसणे, देशांमध्ये, असंघटित (गिग) कामगारांचे कायदेशीर वर्गीकरण अजूनही वादातीत असणे, असंघटित (गिग)कामगारांना किमान वेतन उपलब्ध नसणे, कंपनीकडून व कंत्राटदारांकडून कामगारांना आरोग्य विमा उपलब्ध नसणे, भविष्यनिर्वाह निधी उपलब्ध नसणे, असंघटित (गिग) कामगारांना ओव्हरटाईमसाठी अधिक शुल्क दिले जात नसणे,

यामुळे अनेक असंघटित (गिग) कामगारांमध्ये मानसिक आरोग्य खराब होण्याची मोठ्या प्रमाणात वाढ होत असणे, स्वच्छता, पिण्याचे पाणी, विश्रांतीची ठिकाणे यासारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित असणे, कंपनी तसेच कंत्राटदार यांच्याकडून अपरिहार्यपणे वाढलेल्या किंमतीची भरपाई करण्यासाठी असंघटित (गिग) कामगारांनाचे वेतनामधून भरपाईची रक्कम कमी करत असणे, कोणतेही कारण नसताना असंघटित (गिग) कामगारांचा रोजगार संपुष्टात आणणे, देशातील २१ ते ३५ वर्षातील तरुण मोठ्या प्रमाणात असंघटित (गिग) कामगार म्हणून काम करत असणे, कमी पगार, जास्त काम, रजा (सुट्टी) नसणे, झोप न लागणे यामुळे आरोग्यविषयक समस्या निमीर्ण होत असणे, असंघटीत (गिग) कामगारांमध्ये कायदेशीर हक्काबाबत अज्ञान असणे, कंपनी तसेच कंत्राटदार यांच्या विरोधात तक्रारीसाठी भीतीदायक वातावरण असणे, या कामगारांच्या हक्कांबाबत कोणतीही संघटना नसणे, याबाबत शासनामार्फत तातडीने करण्यात येणारी कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(२७) श्री.राजेश एकडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मागील दोन दशकांपासून नांदुरा ते जळगाव जामोद त्यावरील रेल्वे क्रॉसिंग भुयारी मार्गाचा प्रश्न ऐरणीवर असणे, दिनांक ९ मे, २०२३ रोजी रेल्वे गेट नादुरुस्त झालेले असणे, त्यामुळे सकाळी ९.३० पासून दोन ते अडीच तास वाहतुकीस खोळंबा निर्माण झालेला असणे, त्यादिवशी लग्न मुहूर्त असल्यामुळे वऱ्हाडी नवरदेव व इतर नागरिकांना तसेच ऑफिसच्या कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांना आपल्या ठिकाणी वेळेवर पोहोचता आलेले नसणे, वाहतुकीचा खोळंबा निर्माण झाल्यामुळे रस्त्यावर वाहनांच्या लांब रांगा लागलेल्या असणे, आतापर्यंत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तारांकित प्रश्न, लक्षवेधी अशा विविध आयुधे वापरून हा गंभीर व महत्त्वाचा प्रश्न शासनासमोर उपस्थित केलेला असणे, तरीसुद्धा शासनाकडून कुठलीही कार्यवाही झालेली नसणे, यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये शासनाप्रती प्रचंड रोषाची भावना निर्माण झालेली असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(२८) श्री.सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील भाषिक अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांना काही सवलत किंवा नियमांमधून शिथिलता देण्यात येत असून या भाषिक अल्पसंख्यांक संस्थांना शिथिलता मिळत असणे, जेणेकरून भाषिक अल्पसंख्याक संस्थांना याची मदत व्हावी यासाठी सवलत दिली जाणे, परंतु दिनांक ३१ मे, २०१७ साली शासनाने एक नवीन जीआर काढल्याने संस्थेच्या संचालकांचा शाळेतील निर्गम उतारा देणे बंधन कारक केले असणे, महाराष्ट्र राज्यातील सीमावर्ती भागात कन्नड भाषिक संस्था असणे, या संस्थेमधील संचालक कानडी भाषा बोलत व समजत असणे, परंतु ते महाराष्ट्रातले

असल्याने त्यांचे शिक्षण मराठीत झालेले असणे, नवीन २०१७ च्या शासन जीआर नुसार शाळेच्या निर्गम उतारामध्ये मातृभाषा कन्नड नमूद नसल्याने भविष्यात निर्माण होणाऱ्या भाषिक अल्पसंख्यांक संस्थांना नुकसान होणार असल्याने महाराष्ट्रातील सीमावर्ती भागातील शिक्षण संस्थांमध्ये शासानाप्रती असंतोष निर्माण होणे, यासाठी सदर २०१७ चा जीआर रद्द करून निर्गम उतारा ही अट शिथिल करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२९) ॲड. आशिष शेलार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मराठी भाषा मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मराठी भाषा इंटरनेटवर सर्वाधिक वापरली जाणारी भाषा म्हणून माहिती समोर येणे, दुसरीकडे राज्यात मराठी पुस्तकांच्या विक्रीमध्ये मात्र दिवसागणीक चिंताजनक घट होणे, मराठी ललित साहित्य विक्री करणाऱ्या दुकानांची संख्या अत्यल्प असणे, ३६ जिल्ह्यांत केवळ ४२ दुकाने असणे, यातील बहुसंख्य दुकाने ही मुंबई, पुण्यात असणे, मुंबईत ही केवळ ५ दुकाने असणे, तर २० जिल्ह्यात ललित साहित्य विक्रीची दुकानेच नसल्याची माहिती एका सर्वेक्षणातून समोर येणे, त्यामुळे मराठी कथा, कादंबरी, कविता, समिक्षा, चरित्र ग्रंथ अशी वाडमयीन पुस्तके ग्रामीण भागात, जिल्ह्याच्या ठिकाणी पोहचण्यात अडचणी निर्माण होणे, काही प्रकाशकांनी त्यामुळे अत्यल्प प्रतींमध्ये पुस्तकांच्या आवृत्ती काढण्यास सुरूवात करणे, पुस्तके जीएसटीमध्ये आल्याने किंमतींमध्ये वाढ होणे, १९९० च्या दशकात राज्यात सुरू झालेली ग्रंथ प्रदर्शन ही चळवळ आर्थिक गणिते न जुळल्याने बंद होणे, शासनाने सुरू केलेल्या ग्रंथोत्सवांना शासकीय मार्यादा येणे, भाषेच्या प्रगतीमध्ये ग्रंथांचे अनन्यसाधारण स्थान असल्याने या सगळयाचा विपरित परिणाम साहित्य व्यवहारावर व पर्यायाने मराठी भाषेच्या विकासावर होणे, ग्रंथ व्यवहारावर अवलंबून असलेले प्रकाशक हा अत्यंत प्रतिष्ठेचा व मराठी माणसांचा व्यवसाय अत्यंत अडचणीत येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३०) कॅ.आर. तमिल सेल्वन, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईमधील सायन कोळीवाडा येथील पंजाबी कॉलनीमध्ये निर्वासित यांच्या २५ इमारतींची वसाहत असणे, सदर वसाहतीमध्ये स्वातंत्र्यकाळानंतर अंदाजे १२०० निर्वासित कुटुंब वास्तव्यास असणे, ४ वर्षांपूर्वी सदर इमारती या धोकादायक ठरवून महानगरपालिकेतर्फे पाडण्यात आल्या असणे, मागील कित्येक वर्षांपासून ही १२०० कुटुंब बेघर झालेली असणे, सदर पंजाबी कॉलनी येथील निर्वासितांचे पुनर्वसन म्हाडा मार्फत करण्या करिताचा प्रस्ताव तत्कालीन सरकारतर्फे मान्य झाला असणे, मागील कित्येक वर्षांपासून सदर प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास येणे, सदर इमारती निष्कासित केल्यानंतर येथील १२०० कुटुंब हे रस्त्यावर आल्याची

अग्रिम प्रत

बाब समोर येणे, आजपर्यंत सदर नागरिकांना संक्रमण शिबिराची व्यवस्था अथवा घरभाडे देण्याची कुठलीही तरतूद करण्यात न आल्याने सद्यस्थितीत ही १२०० कुटुंब अतिशय खडतर परिस्थितित जीवन जगत असल्याची बाब निदर्शनास येणे, नागरिकांमध्ये शासनाप्रती कमालीचे असंतोषाचे वातावरण पसरलेले असणे, याकरिता गृहनिर्माण विभागाने तत्कालीन माननीय गृहनिर्माण मंत्री यांच्या निर्णयाचे पालन करून सदर निर्वासितांच्या वसाहतीमध्ये राहणाऱ्या कुटुंबांचे म्हाडामार्फत त्वरित पुनर्वसन करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व पुनर्वसन होईपर्यंत कुटंबाना तात्पुरते संक्रमण शिबिर किंवा मासिक भाडे ऊपलब्ध करून देणेबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(३१) श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"दिनांक २२ मार्च, २०१६ रोजी शासन परिपत्रकाद्वारे म्हाडाच्या ५६ वसाहतीतील सन १९९८ ते २०१८ या कालावधीमधील थकीत सेवा शुल्काचा भरणा करण्याकरिता अभय योजना लागू करणे, सदर अभय योजना लागू होऊन देखील अद्याप म्हाडा रहिवाशांकडून थकीत सेवा शुल्क भरण्याकरिता उदासीनता असणे, वारंवार म्हाडा रहिवासी यांच्याकडून थकीत सेवा शुल्क माफ करण्याची मागणी येणे, दिनांक १४ मे, २०२३ ला म्हाडाच्या बृहन्मुंबई मधील ५६ वसाहतीतील संस्थेकडील सन १९९८ ते २०१८ या कालावधीतील वाढीव सेवाशुल्क माफ करण्याबाबत सर्व गृहनिर्माण संस्थांनी मागणी करणे, सदर मागणीच्या अनुषंगाने सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय यांनी सेवाशुल्क माफ केल्याचे घोषित करणे, अद्याप म्हाडा प्राधिकरणामार्फत सदर घोषणेच्या अनुषंगाने कारवाई प्रलंबित असणे, यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

**(३२) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जोगेश्वरी गुंफा परिसरात गेल्या ५० वर्षापासून अस्तित्वात असलेल्या जयंत चाळ, जमुना निवास व पुष्कर्ण ब्राम्हणवाडी या बैठया चाळी/झोपडपट्टी, पुनर्वसन योजना राबविण्याकरिता सन २००४ मध्ये निष्कासित करण्यात येणे, उक्त चाळींपैकी जमुना निवास या चाळीतील पात्र झोपडीधारकांचे गुंफेच्या केंद्रबिंदूपासून १०० मीटर अंतराबाहेरील क्षेत्रात पुनर्वसानाचे काम प्राधिकरणामार्फत सुरु असणे, तसेच जयंत चाळ व पुष्कर्ण ब्राम्हणवाडी या चाळी गुंफेच्या केंद्र बिंदूपासून २५ मीटरच्या क्षेत्रात असल्याने या चाळींच्या पुनर्विकासाची कार्यवाही रखडलेली असून पुष्कर्ण ब्राम्हणवाडी चाळ निष्क्रिासत करुन इमाररतीचे बांधकाम करण्यात आलेले असणे, परंतु त्या इमारतीमध्ये सोयी-सुविधांचा असलेला अभाव, रहिवाशी अपूर्ण इमारतीमध्ये

जीव मुठीत घेऊन वास्तव्य करित असणे, उक्त चाळीमधील रहिवाश्यांकडून म्हाडाच्या माध्यमातून पुनर्विकास योजना राबविण्याबाबत किंवा पीएपी च्या माध्यमातून हक्काच्या सदनिका उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडे होत असलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी रहिवाश्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेली संभ्रमाची भावना, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून जयंत चाळ,जमूना निवास व पुष्कर्ण ब्राम्हणवाडी चाळीच्या पुनर्वसनाबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(३३) श्री.रविंद्र पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"रायगड जिल्हयातील ता.पेणमध्ये भाल, रतनकोटा व बहिराम कोटक या गावांमध्ये नारवले बेनवले खारभुमी योजनेचे काम चालू असणे, या खारबंदिस्तीचे काम पुर्णपणे निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे पहिल्याच पावसाळयात विठठलवाडी भाल व बहिराम कोटक या गावात बंदिस्ती फुटून आजुबाजूचे जनजीवन विस्क्रळीत होणे, उधाणाच्या पाण्यापासून शेतीचे संरक्षण व्हावे, यासाठी असलेल्या बंदिस्तीने शेतीचे प्रचंड मोठया प्रमाणात नुकसान होणे, हे काम करीत असतेवेळी बऱ्याच ठिकाणी उघाडी (दरवाजे) बंद ठेवणे, त्यामुळे पाण्याचा व्यवस्थित निचरा न होण्याचे प्रकार घडणे, परिणामी शेती आजही खाऱ्या पाण्याखाली असणे, अनेक ठिकाणी खांडी पडल्याने संपूर्ण लाभक्षेत्रातील एकूण १४ गावांमधील लोकांच्या घरात तसेच भातशेतीत खारेपाणी घुसून शेकडो हेक्टर जमीन खाऱ्या पाण्याने बाधित होणे, यामध्ये या योजनेचा भाग अतिशय दलदलीचा असल्याने एकूण १६.४४ कि.मी. लांबीपैकी भाल, रतनकोटा आणि बहिराम कोटक या गावांचा भाग या खाडीला लागून असल्याने याच खाडीतून जे.एस.डब्ल्यू. या कंपनीची मालवाहतूक करणारी मोठी जहाजे ये-जा करीत असणे, जहाजांची वाहतूक सुरळीत होण्यासाठी कंपनीकडून खाडीमध्ये उत्खनन करून खाडीची खोली वाढविण्याचे प्रकार घडणे, परिणामी आजूबाजूच्या असणाऱ्या इतर उप खाडयांची खोली २० ते २५ फुटांनी वाढणे, याच वाढलेल्या खोलीमुळे ओहोटीचे वेळी पाण्याला मंथन गती येवून आहोटीचे पाण्यामुळे बंदिस्तीच्या खालील बाजूची जमीन वाहून जाण्याचे प्रकार घडणे, मोठया प्रमाणात भराव खाडीमध्ये ढासळून जाणे, या वारंवार घडणाऱ्या प्रकारांमुळे स्थानिक जनतेमध्ये शासनाविरूध्द नाराजीची भावना निर्माण होणे, भविष्यात नारवेल-बेनवले बंधारा फुटल्यास हजारो कुटूंबांवर स्थलांतर होण्याची शक्यता निर्माण होणे, आणि हा भाग समुद्रात विलीन होण्यापासून वाचविण्याकरीता व शेतकऱ्यांच्या भातशेती व घरांचे प्रचंड होणारे नुकसान टाळण्यासाठी दीर्घकाळ उपाय योजना म्हणून अशा पध्दतीचे काम करण्याचा अनुभव असलेल्या मेरीटाईम बोर्ड ऑफ इंडीया या संस्थेला असल्याने या संस्थेमार्फत तेथे शिट पाईलींगचे बांधकाम करून जनतेला त्वरीत दिलासा देण्यासाठी शासनाने ताबडतोब करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

**(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) संबंधित निवेदने सभागृहासमोर ठेवणे :-**

(सभागृहात चर्चेकरिता न आलेल्या म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र अमुद्रित स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत आहे.)

**सहा : मा. मुख्यमंत्री यांचा प्रस्ताव :-**

"राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवडीसाठी राबविण्यात आलेली विशेष मोहिम" या विषयावरील श्री.रमेश कोरगांवकर व इतर वि.स.स. यांच्या दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी उत्तरीत झालेल्या ता.प्र.क्र.२१८०९ वरील चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार घटीत करण्यात आलेल्या तदर्थ समितीचे पुनर्गठन करणे."

**सात : शासकीय विधेयके :**

(अ) **"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) आणि महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२३" दोन्ही सभागृहाच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतच्या प्रस्तावास विधानपरिषदेच्या सहमतीसंबंधी विधानपरिषदेकडून आलेला संदेश.**

**(ब) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० – महाराष्ट्र (भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरीता) शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी विधेयक, २०२३

**(२)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – कीटकनाशके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३

**(३)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ – बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३

**(४)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ – अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३

**(५)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ – महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२३

अप्रकाशित प्रत

**(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.शिरिष चौधरी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमिन पटेल, विकास ठाकरे, नाना पटोले व संजय जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

अप्रकाशित प्रत

(२) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० — महाराष्ट्र (भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरीता) शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी विधेयक, २०२३

---

(३) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ — बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३

---

(४) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३

---

(५) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — कीटकनाशके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३

---

(६) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ — महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२३

(गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

**आठ : म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

सर्वश्री बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुनिल प्रभू, नाना पटोले, राजेश टोपे, पृथ्वीराज चव्हाण, रविंद्र वायकर, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री प्राजक्त तनपुरे, राजन साळवी, विजय वडेट्टीवार, अनिल देशमुख, सुनिल राऊत, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, सुनिल केदार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, वैभव नाईक, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय पोतनीस, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री रमेश कोरगावकर, अमिन पटेल, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नितीन देशमुख, सुरेश वरपुडकर, उदयसिंग राजपूत, रणजीत कांबळे, श्रीमती ऋतुजा लटके, श्री.संग्राम थोपटे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री कैलास गौरंट्याल, अमित झनक, कुणाल पाटील, शिरीष चौधरी, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, पी.एन. सडोलीकर-पाटील, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे,

**बळवंत वानखडे, राजू पारवे, विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, हिरामण खोसकर, झिशान सिध्दीकी, संजय जगताप, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, राजू आवळे, विक्रमसिंह सावंत, जितेश अंतापूरकर, श्रीमती जयश्री जाधव, श्री.रविंद्र धंगेकर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात सातत्याने होणारा खातेबदल, कामाच्या विभागांकडे मंत्र्यांचे होत असलेले दुर्लक्ष, एकाच मंत्र्याकडे एकाहून अधिक जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी असणे, त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला खीळ बसणे, राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय असणे, शासनाने विधानसभेत स्पष्ट आश्वासन देऊनही राज्यातील हजारो शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर रकमेचा लाभ न मिळणे, बोगस बी-बियाणे व खते विक्रीचे रॅकेट कार्यरत असूनही त्यावर गांभीर्याने कारवाई न होणे. राज्यातील नदी-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व साखळी बंधाऱ्यांची कामे घेण्याची आवश्यकता, क्षतिग्रस्त तलावांसह सध्या कार्यान्वित असलेले सिंचन प्रकल्प निधीअभावी रखडणे, "शासन आपल्या दारी" उपक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा ऑफलाईन देऊन त्याला राजकीय स्वरुप देणे, जनतेस त्याचा काहीही फायदा न होणे व कार्यक्रमाची जाहिरात व अंमलबजावणीसाठी अब्जावधी रुपयांचा वारेमाप खर्च होणे, तत्कालीन विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी महाराज नगर (औरंगाबाद) यांनी शेतकऱ्यांना सहाय्यभूत अनेक शिफारशी करणे, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजीची भावना निर्माण होऊन त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणे, मागील सरकारने मंजूर केलेल्या समृध्दी महामार्गाचाच भाग असलेल्या जालना नांदेड महामार्गचे काम कुर्मगतीने सुरु असणे, जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला न मिळणे, नांदेड-लातूर रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापही तयार न होणे, मराठवाड्यामध्ये बूलेट ट्रेन प्रकल्प आणण्याकरिता शासन उदासीन असणे, हिंगोली सारख्या "ना उद्योग" भागातील सहकारी साखर कारखान्यांना पॅकेज स्कीम इन्सेंटिव अंतर्गत मिळणाऱ्या सवलती काढून घेणे, विमानतळांचा विकास व अद्यावतीकरणाबाबत शासन उदासीन असणे, राज्यभर विमानतळे उपलब्ध असूनही निवडक शहरे वगळता इतरत्र विमानसेवा सुरू नसणे, मनमाड औरंगाबाद परभणी रेल्वेच्या दुपदरीकरणास सुरुवातही न होणे, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे काम खोळंबणे मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घाईगडबडीने वॉटर ग्रीडची संकल्पना राबविणे, बाभळी धरणातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी तेलंगणा राज्याच्या सहमतीने सर्वोच्च न्यायालयाकडे संदर्भ न करणे, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची आवश्यकता असणे, शासकीय रुग्णालये व महाविद्यालयांची झालेली दुरवस्था वैद्यकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, एसईबीसी मधून ईडब्ल्यूएसचा विकल्प दिलेल्या मराठा उमेदवारांच्या नियुक्तीचे प्रकरण उर्जा विभागाकडे मागील दोन महिन्यांपासून प्रलंबित असणे, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत

केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, मराठा व इतर आरक्षणाच्या संदर्भात प्रचंड मोर्चे, उपोषणे, आत्महत्या करुनही या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, शासनाच्या विविध विभागातील पद भरती करीता आयोजित करण्यात येत असलेल्या परिक्षांचे शुल्क अत्यंत जास्त असल्याने गरीब कुटुंबातील परिक्षार्थीना शुल्क भरण्यात अडचणी येणे, केवायसीच्या नावाखाली अतिवृष्टी व पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अनुदान न मिळणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, राज्याची ढासळलेली अर्थव्यवस्था, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामासाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेली खीळ, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कामांना दिलेली स्थगिती अद्यापही न उठविल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव)**

**नऊ** : **अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**सर्वश्री बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, अजय चौधरी, विजय वडेट्टीवार, अशोकराव चव्हाण, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री नाना पटोले, सुनिल केदार, सुनिल प्रभू, राजेश टोपे, पृथ्वीराज चव्हाण, रोहित पवार, प्रा. वर्षा गायकवाड, डॉ.विश्वजीत कदम, श्री रविंद्र वायकर, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री प्राजक्त तनपुरे, राजन साळवी, अनिल देशमुख, सुनिल राऊत, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, बाळासाहेब पाटील, सुनिल केदार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, वैभव नाईक, संजय पोतनीस, ॲड. अशोक पवार, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री रमेश कोरगावकर, अमिन पटेल, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नितीन देशमुख, सुरेश वरपुडकर, उदयसिंग राजपूत, शंकरराव गडाख, रणजीत कांबळे, श्रीमती ऋतुजा लटके, श्री संग्राम थोपटे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री कैलास गोरंट्याल, अमित झनक, कुणाल पाटील, शिरीष चौधरी, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, पी.एन. सडोलीकर-पाटील, शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे, बळवंत वानखडे, राजू पारवे, विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, हिरामण खोसकर, झिशान सिध्दीकी,**

**संजय जगताप, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, राजू आवळे, विक्रमसिंह सावंत, जितेश अंतापूरकर, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री रविंद्र धंगेकर, सुनिल भुसारा, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात जीवनावश्यक वस्तूंमध्ये झालेली भरमसाठ दरवाढ, ३७ टक्के दरवाढीमुळे वीज ग्राहक मेटाकुटीस येणे, बगॅसवर महावितरण कंपनीने साखर कारखान्यांकडून वीज खरेदीच्या दरात केलेली कपात, परिणामी साखर उद्योग अडचणीत येणे, महाऊर्जा संकेतस्थळात सातत्याने निर्माण होणाऱ्या तांत्रिक बिघाडामुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असणे, १५ ते २० वर्षापूर्वीची थकबाकी टाकून वीज ग्राहकांकडून वीज बिले वसुलीसाठी महावितरण कंपनीकडून तगादा लावला जाणे, सहकारी पाणी संस्थांच्या वीजबिलात एप्रिल, २०२३ पासून पाच पटींनी केलेली भरमसाठ वाढ, ट्रान्सफॉर्मरअभावी शेतीच्या वीज जोडण्यासाठीचे प्रलंबित असलेले अर्ज, उद्योगांसाठीच्या वीज दरात मोठी वाढ झाल्याने उद्योग राज्याबाहेर जाण्याची भीती निर्माण होणे, शेतीपंप वीज जोडणीत झालेल्या भ्रष्टाचाराबाबत महावितरण कंपनीकडून अहवाल सादर करण्यात होत असलेली दिरंगाई, सौरउर्जा पॅनेलसाठी शासनाने आखून दिलेल्या दराऐवजी पुरवठादारांकडून दुप्पट दर वसूल होत असणे, एकात्मिक पाठयपुस्तकांचा दर्जा चांगला नसल्याने विद्यार्थी व पालकांना झालेला मनस्ताप, याबाबत चौकशी करण्याची आवश्यकता, अनधिकृत व बेकायदेशीर शाळांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य टांगणीला लागणे, शिक्षकांच्या रिक्त जागा तातडीने भरण्याची आवश्यकता, आरटीईअंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या फीचा परतावा थकीत असल्यामुळे अनेक शाळा आर्थिक अडचणीत येणे, बनावट शैक्षणिक प्रमाणपत्र बनविणाऱ्या टोळया कार्यरत असल्याची बाब उघडकीस येणे, आयआयटी व आयआयएम सारख्या संस्थांमध्ये विद्यार्थी गळती व आत्महत्यांचे वाढलेले प्रमाण, विविध शासकीय विद्यापीठात सुरु असलेला सावळागोंधळ, विद्यापीठांमध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षक व शिक्षकेतर पदे रिक्त असणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत योग्य नियोजनाअभावी होत असलेला विलंब, डिप्लोमा इन व्हेटर्नरी सायन्स अभ्यासक्रमाची या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी न होणे, राज्यातील शैक्षणिक संस्थांची देशपातळीवर क्रमवारीत झालेली घसरण, चर्नी रोड येथील सावित्रीबाई फुले शासकीय महिला वसतिगृहातील दुर्घटनेनंतर वरिष्ठांना पाठीशी घातले जाणे, राज्यातील ग्रामीण भागात आरोग्यव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, राज्यातील चार जिल्ह्यात रेडिएशन सेंटर व कॅथ लॅब सुरु करण्याची घोषणा होऊनही अंमलबजावणीत होत असलेली दिरंगाई, अनधिकृत गर्भपात केंद्रांवर आळा घालण्यात सरकारला आलेले अपयश, शासकीय रुग्णालयांमधील औषधांच्या तुटवड्यामुळे रुग्णांचे होत असलेले हाल, अर्थसंकल्पात सार्वजनिक आरोग्य विभागाला पुरेसा निधी न मिळाल्यामुळे अनेक योजना रखडणे, जे.जे.रुग्णालय समुहातील सेंट जॉर्ज रुग्णालयात कर्मचाऱ्यांसह निवासी डॉक्टरांचा तुटवडा असल्याने काही विभाग बंद करण्याची ओढवलेली नामुष्की, कोविड महामारीत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना अद्यापही आर्थिक मदत न मिळणे, राज्यात बोगस डॉक्टरांचे फुटलेले पेव, राज्याची एचआयएमएस प्रणाली बंद असल्याने रुग्णांना होत असलेला मनस्ताप, रॅगिंगविरोधी कायदा

अमुद्रित प्रत

असूनही गेल्या वर्षभरात वैद्यकीय महाविद्यालयात रॅगिंगच्या चार घटना घडल्याचे उघडकीस येणे, ऑनलाईन गेमींगमुळे समाजातील तरुण व महाविद्यालयीन मुलांच्या भविष्यावर होत असलेले दुष्परिणाम, ऑनलाईन गेमींगमुळे लाखो तरुण उध्दवस्त होत असून त्यावर बंदी घालण्याची आवश्यकता, महापालिका रुग्णालयात जाणुनबुजून औषध तुटवडा निर्माण करण्याच्या झालेल्या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता, ग्रामीण भागात शिक्षकांच्या १८ हजार जागा रिक्त असणे, बोगस शाळा व बोगस शिक्षकांवर कारवाई करण्याबाबत विभागाकडून होत असलेली टाळाटाळ, महसूल विभागातील जुने अभिलेख जीर्ण होणे, गायरान जमिनीवर गरीब, आदिवासींनी नाईलाजास्तव केलेली अतिक्रमणे नियमित करण्याबाबत सरकारकडून होत असलेली चालढकल, नवीन वाळू धोरणाचा उडालेला बोजवारा, अनुसूचित जाती व जमाती आयोगासाठी केंद्राच्या धर्तीवर स्वतंत्र कायदा करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, बार्टीसारख्या संस्था निर्माण करण्यामागील उद्देश सफल न होणे, बार्टीच्या भोंगळ कारभारामुळे पात्र विद्यार्थ्यांना फेलोशिप मंजूर न होणे, अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जेईई व नीट प्रवेश परीक्षा प्रशिक्षण योजना बार्टीकडून राबविली न जाणे, इतरमागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राज्यात ७२ वसतीगृहे मंजूर होऊन अदयाप सुरु न करणे, तसेच बिहारच्या धर्तीवर इतर मागासवर्गीय समाजाची जनगणना करणे आवश्यक असणे, समता प्रतिष्ठानमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाबाबत सरकारच्या निष्क्रियतेमुळे धोरण ठरविण्यात झालेला अक्षम्य विलंब, धोकादायक झालेल्या शासकीय वसतिगृहांच्या पुनर्विकासाबाबत तातडीने धोरण ठरविण्याची आवश्यकता, मागासवर्गीय औद्योगिक सहकारी उत्पादन संस्थांचे प्रस्ताव दीर्घकाळ प्रलंबित असणे, स्वाधार योजनेतील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता अदा केला जात नसल्यामुळे विद्यार्थ्यांची होणारी परवड, अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाचा निधी अखर्चित राहणे, धर्मादाय संस्थाच्या जमिनी शासनाने आदेश देऊनही ताब्यात देत नसणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अस्सुधारित प्रत

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**दहा : अशासकीय विधेयके :-**

**पुरःस्थापनार्थ :**

**(शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अशासकीय विधेयकाच्या सूचना क्रमांक १ ते ३)**

(१) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२१ - **श्री. सुहास (आण्णा) कांदे, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२२ - **श्री.प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ - महाराष्ट्र परदेशातील रोजगार संरक्षण विधेयक, २०२२ - **डॉ.राहुल वेदप्रकाश पाटील, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३ - **श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचे.**

**अकरा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अशासकीय ठरावांच्या सूचना क्रमांक १ ते ३)**

**(१) श्री. नारायण कुचे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २६५**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्री. किसन कथोरे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २५५**

"राज्यात वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे"

**(३) श्री.अमित देशमुख, वि.स.स. यांचा ठराव क्र. १८३**

"राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

अप्रकाशित

**मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी बॅलटव्दारे काढण्यात आलेल्या अशासकीय ठरावांच्या सूचना क्रमांक ४ ते ६)**

**(४) श्री. संजयमामा शिंदे, वि.स.स. यांचा ठराव क्र. १६९**

"शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असे असूनही पिक विमा नुकसान भरपाई पासून उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(५) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. १४३**

"शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, कीटकनाशके यांच्या किमतींमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(६) ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांचा ठराव क्र. ६९**

"राज्यात मुख्यतः शाळांमध्ये अमंली पदार्थांची वाढत असलेली विक्री व अमंली पदार्थांचा महाविद्यालयातील युवकांमध्ये होत असलेला प्रसार व त्यामुळे विद्यार्थी जीवनावर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेऊन शासनाने शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता मोहीम सुरु करून अमंली पदार्थांच्या विक्रीवर आळा बसविण्यासाठी करावयाची कारवाई व उपाययोजना विचारात घेण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

# " राष्ट्रगीत "

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३ ऑगस्ट, २०२३

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

अग्रिम प्रत